अर्थ : दुर्बुद्ध माणसांना प्रभु दत्तात्रेयाची आराधना दुष्कर आहे. परंतु ज्यांची बुद्धी चांगली आहे, त्यांना प्रत्यगभिन्नत्वामुळें, हे राजा, त्या दत्तात्रेयांची आराधना सुकर होते. ज्याचे स्नान गंगेत होतें, जो कोल्हापुरांत भिक्षा स्वीकारतो, सह्याद्री पर्वतावर रहातो, जो क्षणोक्षणी स्मरणकर्त्यापुढें उभा रहातो, विषयांचे ठिकाणीं ज्यांचे चित्त गुंतलेलें असतें त्यांना जो अतिशय अप्राप्य आहे, परंतु सद्भक्त, निर्मलचित्त अशा लोकांना जो अगदीं जवळ असतो, अशा श्रीदत्तात्रेयांच्या उपासनेनें काय बरें साध्य होणार नाहीं ? जो हें अखिल विश्व निर्माण करतो, त्याचें पालन करतो व नाशही करतो, त्याच श्रीदत्तात्रेयांना तू अत्यंत भक्तियुक्त अंतःकरणानें शरण जा. " वरील भाषण ऐकून अर्जुनानें प्रश्न केला, " श्रीदत्तात्रेयांची उपासना, पूजा देवेंद्रानें कोणत्या प्रकारे केली ? ते मला सांगावें. तसेंच एवढा मोठा प्रभाव या देवाचा आहे तर त्याचें सविस्तर वर्णन मला कृपा करून सांगावे. मीही श्रद्धायुक्त अंतःकरणाचा आहे. तसेंच, हे मुनिवरा त्या दत्तात्रेयांचीच उपासना करण्याची माझी इच्छा आहे." असें अर्जुनाचें भक्तियुक्त अंतःकरणाचें बोलणें ऐकून गर्गमुनींनी सर्वव्यापक श्रीदत्तात्रेयांचे स्मरण करून बोलण्यास प्रारंभ केला.

॥ इति कार्तव्यार्जुनचरितं नाम तृतीयाष्टके तृतीयोऽध्यायः ॥

॥ अथ गर्गेण देवविजयकथनं नाम तृतीयाष्टके चतुर्थोऽध्यायः ॥

ॐ ॥ नतावनात्तसुभगव्रतोऽयं परमेश्वरः ॥
तल्लीलां श्रृणु भूपेन्द्रो यतोऽभीष्टार्थभागभूत् ॥१॥
स दैत्यो दैत्यराट् जम्भो देवेन्द्रोपि सदेवतः ॥
स्वर्गायायुध्यतान्योन्यं दिव्यवर्षं पुरा भृशम् ॥२॥
दैत्यैर्देवाः पराभूता गत्वोचुर्जीवमातुराः
दृष्टाः पराजयो नोऽद्य तत्किं कार्यमतः परम् ॥३॥
तानाश्वास्याह धिषणो दत्तात्रेयं तपोधनम् ॥
शरणं यात वरदः स कार्यं वः करिष्यति ॥४॥

इत्युक्तः सामरः शक्रः प्राप दत्ताश्रमं शुभम् ॥
तत्र देवं महात्मानमप्रतर्क्यं ददर्श सः ॥५॥
दिगम्बरमपि स्वाङ्के धृत्वा बालां दिगम्बराम् ॥
अनघां सुदतीं तन्वीं पानासक्तामपि स्थितम् ॥६॥

अर्थ : (ह्या अध्यायांत श्रीगर्गाचार्यांनी देवांचा महान विजय वर्णिला आहे. त्यानंतर अर्जुन गुरुंकडे गेला, आणि नम्रपणें नमस्कार करून अभिष्ट प्राप्ति करून घेता झाला.) श्रीगर्गमुनी म्हणाले, " हे अर्जुना, भक्तियुक्त अंतःकरणानें नम्र झालेल्यांचे रक्षण करण्याचे व्रत ज्यानें घेतलें आहे, तो हा श्रीदत्तात्रेय आहे. हे राजा, ज्या पासून इंद्राने अभिष्ट प्राप्त करून घेतले; त्या श्रीदत्तात्रेयांच्या दिव्य लीला तू श्रवण कर. पूर्वी दैत्य राजा जंभासुर व देवेंद्र यांचें स्वर्गप्राप्तीसाठीं बराच कालपर्यंत आपसात युद्ध चालू होतें. जंभासुरास दैत्यांचे सहाय्य व देवेन्द्रास देवांचे साह्य होतें. त्या युद्धांत दैत्यांनी देवांचा पराभव केला. तेव्हां पराजित झालेले देव बृहस्पतीकडे जाऊन म्हणाले, " आमचा पराजय झालेला आपण पाहिलेला आहेच. तर आता आम्ही काय करावें ? " तेव्हां त्यांना आश्वासन देवून बृहस्पती म्हणाले, " तुम्ही सर्व श्रीदत्तात्रेयांस शरण जा, तो वरद असून तुमचे कार्य तडीस नेईल व शत्रूंवर विजय मिळवून देईल. " हें वचन ऐकून देवांसह इंद्र शुभ अशा श्रीदत्तात्रेयांकडे येऊन पोचला. तेथें त्यानें श्रीदत्तात्रेयांचे तर्कास न समजणारें असें रूप पाहिलें. दत्तात्रेय ब्राह्मण, किंवा क्षत्रिय, किंवा वर्णाश्रमी, किंवा गृहस्थ किंवा संन्यासी, यापैकी कोण आहे तें समजण्यासारखें नव्हतें. कारण ते नग्न असून त्यांच्या मांडीवर बाल अशी नग्न स्त्री बसलेली होती. ती निष्पाप, सुदंती, सुंदर देह धारण केलेली, आणि मद्यपान करण्यांत गढलेली होती.

दृष्ट्वैवमपि ते चक्रुः सेवां सर्वेऽमराः सदा ॥
तिष्ठन्तमुपतस्थुस्ते प्रणाता यान्तमन्वगुः ॥७॥

भक्त्यैवं बहुकालं ते सेवयामासुरादरात् ॥
अथैकदाऽऽह भगवान्देवाः किं सेवयेच्छथ ॥८॥
देवाः ऊचुः प्रणम्येषं परमात्मञ्जगत्प्रभो ॥
सयज्ञभागं त्रैलोक्यं दानवैरखिलं हृतम् ॥९॥
वयं हृताधिकारश्च तिष्ठामो मर्त्यवद्भुवि ॥
परित्राणाय नो देव तद्वधे च धियं कुरु ॥१०॥
त्वद्भक्तानां सुराणां नो विना त्वच्चरणाम्बुजात् ॥
गतिर्न विद्यते भूमन्पाह्यार्तान्छरणागतान् ॥११॥
प्रहस्य प्राह तान्छ्रीमानहमुच्छिष्टदूषितः ॥
मद्यासक्तो वशी नैव मत्तः किं भवतां भवेत् ॥१२॥

अर्थ : श्रीदत्तात्रेयांचे असें कोड्यात टाकणारें व विचित्र रूप पाहूनही इंद्रप्रमुख सर्व देवांनी त्याची सेवा मनोभावें करण्यास सुरुवात केली. श्रीदत्तात्रेय उभे राहिले कीं देव उभे रहात. ते चालू लागले म्हणजे आपण सर्व नम्रभावानें हात जोडून त्यांचे मागून चालू लागत. अशा रीतीने बहुकालपर्यंत भक्तिपूर्ण अंतःकरणानें आदराने सेवा केली असतां भगवान् श्रीदत्तात्रेय देवांना म्हणाले, " हे देवांनो, सेवा कोणत्या इच्छेनें करीत आहांत ? " त्यावर देव नमस्कार करून म्हणाले, " हे परमात्मन्, जगत्प्रभो यज्ञभागासह सर्व त्रैलोक्य दानवांनी हरण केलें आहे. आमचे अधिकार हिरावून घेतले आहेत. तेव्हां आम्ही दिनवत् मर्त्यांप्रमाणें स्वर्गांत वास्तव्य करून आहोत. तेव्हा आमच्या संरक्षणासाठीं व दानवांच्या वधासाटीं विचार करावा अशी आपल्याला विनंती आहे. तुझे भक्त असणाऱ्या आम्हा देवांना तुझ्या चरणकमलावाचून अन्य आधार नाहीं. तेव्हां हे सर्वव्यापका श्रीदत्तात्रेया, शरण आलेल्या आम्हा पीडितांचे तूंच रक्षण कर. " हे दीन भाषण ऐकून श्रीदत्तात्रेय भगवान् हसून म्हणाले, " अहो मी श्रीमान् आहे, परंतु उच्छिष्ट भक्षण व पान करून दूषित झालो आहे. मी मद्यासक्त आहे. माझा स्वतःवर ताबा नाही, पराधीन आहे, अशा माझ्याकडून तुमचा काय उपयोग होणार आहे ?

स्त्रीसंभोगो हि दुःखाय पाताय च पुनस्तु चः ॥
दैवादुच्छिष्टतामस्याः प्राप्तोहं किमतो भवेत् ॥१३॥
देवा ऊचुस्त्वमनघो ज्ञानदीपोऽनघाऽप्यसौ ॥
विद्या तव विभो यस्याः प्रसादात्सद्गतिः खलु ॥१४॥
यथार्कस्य प्रभा भूमान्विप्रचाण्डालसङ्गिनी ॥
पुण्यं पापं च नादत्ते तथेयं प्रकृतिस्तव ॥१५॥
श्रीदत्तः प्राह यद्येवं भवतां संमतं ततः ॥
युद्धायाहूयतां दैत्यानिहानयत मा चिरम् ॥१६॥
ततो हृष्टाः सुरा जग्मुर्दैत्यांस्तेऽपि महाबलाः ॥
मुञ्चन्तो विविधास्त्रौघान्युयुधुर्मदविह्वला ॥१७॥
पलायनपरा आसन्देवास्तेऽसुरपीडिताः ॥
पृष्ठतोऽनुव्रजन्तस्ते दैत्या दत्ताश्रमं गताः ॥१८॥

अर्थ : स्त्रीसंभोगानें दुःखच होते, तसेंच अधःपातही होतो. दैवयोगानें मी हिचें उच्छिष्ट भक्षण केले आहे. आतां यापासून काय होणार ? " हें श्रीदत्तात्रेयांचे भाषण ऐकून देव म्हणाले, " हे दत्तात्रेया ! तू निष्पाप आहेस, ज्ञानदीप आहेस आणि ही तुझ्या अंकावरील स्त्रीसुद्धां निष्पाप आहे, ही तुझी विद्या आहे, तिच्या कृपेनेंच मोक्ष प्राप्त होतो. हे सर्वव्यापका, सूर्याची किरणें विप्र व चण्डाल या दोघांवरही पडतात, परंतु विप्राचें पुण्य अगर चण्डालाचें पाप, यापैकी कांहींही ती किरणें घेत नाहींत (त्यापासून अलिप्त असतात) त्याचप्रमाणें ही तुझी प्रकृति आहे. " यावर श्रीदत्तात्रेय म्हणाले, " हें जर तुम्हांस खरोखर मान्य असेल तर दैत्यांना युद्धाचें आमंत्रण द्या व कसेंही करून त्यांना लवकर इकडे घेऊन या. " हें ऐकून देवांना आनंद झाला व ते दैत्यांकडे गेले. दैत्यही खूप शूर होते, व त्यांनी विविध प्रकारची अस्त्रें सोडून देवांना जर्जर केले. दैत्यांनी जर्जर केलेले देव पळूं लागले, तेव्हां दैत्यांनी त्यांचा पाठलाग सुरू केला आणि ते श्रीदत्तात्रेयाच्या आश्रमापाशी येऊन पोचले.

कालयन्तः सुरान्दैत्या हन्यमानान्भयातुरान् ॥
श्रीदत्तपृष्ठसंलग्नान्समस्ताञ्छरणार्थिनः ॥१९॥
ददृशुस्ते महात्मानं दत्तात्रेयं दिगम्बरम् ॥
तन्वीं तद्वामपार्श्वस्थां चार्वङ्गीं प्रमदोत्तमाम् ॥२०॥
पद्मपत्रायताक्षीं तां सुदतीं सुस्तनीं शुभाम् ॥
सर्वयोषिद्गुणाढ्यां ते दृष्ट्वाऽऽसन्काममूर्च्छिताः ॥२१॥
साभिलाषास्ततो दैत्यास्त्यक्त्वा देवान्वधूं वराम् ॥
हर्तुं मनो दधुः सर्वे तत्सौन्दर्यविमोहिताः ॥२२॥
वयं स्त्रीरत्नलाभेन कृतार्था इति तेऽसुराः ॥
उक्त्वा बलात्स्त्रियं क्षिप्त्वा शिबिकायां च के दधुः ॥२३॥
स्वस्थानाभिमुखा जग्मुः सानुरागाः स्मरातुराः ॥
योगीन्द्रोऽथ प्रहस्याह दानवान्पश्यतामराः ॥२४॥
पराङ्गनाभिमर्शोत्थ पापेनाति बलीयसा ॥
हतश्रीका हतबला जाता एते न संशयः ॥२५॥

अर्थ : मारले जाणाऱ्या, भयातुर अशा देवांना असुर युद्धाकरता आव्हान देत होते, परंतु सर्व देव श्रीदत्तात्रेयांच्या आसऱ्यासाठीं त्यांच्या मागें जाऊन लपून राहिले. तेव्हां दैत्यांनी महात्मा अशा श्रीदत्तात्रेयांना पाहिलें, तसेंच त्यांच्या डाव्या मांडीवर बसलेल्या अत्यंत सुंदर अशा तरुण स्त्रीला पाहिले. त्या स्त्रीचे डोळे कमलपत्राप्रमाणें विशाल होते. तिचे दांत डाळिंबाच्या दाण्याप्रमाणें होते. स्तन पुष्ट होते, स्त्रीयांचे जे जे चांगले गुण ते सर्व तिच्या ठिकाणीं होते. अशा त्या स्त्रीला पाहून सर्व दैत्य कामवासनेनें मूर्च्छित होऊन गेले. त्यांना त्या स्त्रीचे ठिकाणी अत्यंत अभिलाषा उत्पन्न झाली व तिच्या सौंदर्यानें विमोहित होवून त्यांनी देवांचा विचार मनातून काढून टाकला व त्या स्त्रीला पळवून नेण्याचा विचार केला. ह्या स्त्री रत्नाच्या प्राप्तीनें आपण कृतार्थ होवू असें म्हणून बळजबरीने त्या स्त्रीला श्रीदत्तात्रेयांच्या

मांडीवरून काढून पालखींत बसविलें व पालखी मस्तकावर धारण करून कामवासनेनें आतुर होवून मोठ्या प्रेमाने ते स्वस्थानाकडे निघाले. तेव्हां योगीराज श्रीदत्तात्रेय हसून म्हणाले, " हे देवांनो, दानवांकडे पहा. परस्त्रीच्या स्पर्शानें निर्माण झालेल्या अतिभयंकर पापामुळे ह्या दैत्यांची संपत्ति व बल निःसंशयपणे नाहीसें झालेले आहे.

श्रीः पदगाऽऽलयदात्री सक्थिगतांशुकदात्री ॥
गुह्यगता प्रमदादा क्रोडगतार्भकदा चेत् ॥२६॥
चेद्हृदि कामितदात्री कण्ठगता वसुदात्री ॥
चेन्मुखगाऽशनवाग्दा मूर्धगता तु शिरोघ्ना ॥२७॥
तन्मूर्धगाऽधुनेयं श्रीः शीर्षाण्युत्कृत्य सत्वरम् ॥
आयास्यत्यत्र नैवात्र शङ्का ह्येते मृतोपमाः ॥२८॥
हन्यन्तां तन्न भेतव्यं प्राप्तोऽद्य विजयक्षणः ॥
भवन्तोऽत्र निमित्तं ते हतप्रायाः श्रियार्दिताः ॥२९॥
इत्युक्तास्ते सुरा गत्वा शस्त्रैर्दैत्यशिरांसि तु ॥
फलानीवाशु वृक्षेभ्यः पातयामासुरुद्यताः ॥३०॥
हतेषु तेष्वजं प्राप्ता श्रीरूत्पत्त्याऽविभागिनी ॥
देवा अपि ययुः स्वर्गं पूर्ववच्छ्रीधराज्ञया ॥३१॥
एवंप्रभावः श्रीदत्त ईशस्तं शरणं व्रज ॥
इत्युक्तःसोऽर्जुनस्तेन श्रीदत्ताश्रममाययौ ॥ ३२ ॥

अर्थ : श्री म्हणजे लक्ष्मी, आपल्या पायांना स्पर्श करते तेव्हां गृहप्राप्ति होते. मांडीस स्पर्श केला असतां वस्त्रलाभ होतो. गुह्यस्थानास स्पर्श केला असतां स्त्रीप्राप्ति होते. बाहुमध्ये आली असतां अपत्यलाभ होतो. हृदय स्पर्श केला असतां मनोरथ पूर्ण होतात. तिनें कंठास स्पर्श केला तर धन मिळते. मुखांत आली तर उत्तम भोजनाचा व वाणीचा लाभ होतो. आणि ती जर मस्तकावर बसेल तर शिराचा नाश करील, तोडून टाकील.

ज्या अर्थी आतां लक्ष्मी दैत्यांच्या शिरावर आरोहित झाली आहे त्या अर्थी त्यांची शिरें तोडून ती सत्वर येथें येईल यांत कांहीं शंका नाहीं. दैत्य आता मृतप्राय झाले आहेत असेंच समजा. त्यांचा तुम्ही न मितां संहार करा. तुमच्या विजयाचा क्षण आज आलेला आहे. तुम्ही केवळ निमित्तमात्र आहांत. त्यांना लक्ष्मीनें जवळजवळ मारलेलेच आहे.'' श्रीदत्तात्रेयांचें हे आश्वासक भाषण ऐकल्यावर देव गेले व जणूंकाय झाडापासून फळें तोडावीत इतक्या सहजतेनें त्यांनी शस्त्रांनी दैत्यांची शिरें तोडून टाकलीं. सर्व दैत्यांचा संहार झाल्यावर अविभिन्न अशी लक्ष्मी देवी श्रीदत्तात्रेयांकडे येऊन स्थानापन्न झाली. नंतर श्रींची आज्ञा घेऊन देवही पूर्ववत् स्वर्गास गेले. गर्गाचार्य म्हणाले, "असा हा श्रीदत्तप्रभूंचा महिमा आहे. त्या परमेश्वराला तूं शरण जा." हें भाषण ऐकून सहस्रार्जुन श्रीदत्तात्रेयांच्या आश्रमाकडे आला.

गर्गोक्तिश्रवणादेव भक्त्युत्कण्ठितधीर्नृपः ॥
सह्याद्रिमेत्य योगीन्द्रं दृष्ट्वा हर्षमवाप सः ॥३३॥
अस्य दासो भवामीति निश्चित्यानुदिनं स्मरन् ॥
सिषेवे परमानन्दो वारितो भर्त्सितोपि सः ॥३४॥
पादाङ्गसंवाहनेन मद्याद्याहरणेन च ॥
स्रक्चन्दनसुगन्धादिफलाद्यानयनेन च ॥३५॥
निद्रालस्यादि संत्यज्य सदा तद्गतमानसः ॥
इङ्गितज्ञोऽभजद्भूप उच्छिष्टोपासनेन च ॥३६॥
भगवानपि तद्भावं परीक्षितुमपातयत् ॥
दृष्टिमात्रेण दोर्युग्मं स्मयमानस्तमाह च ॥३७॥
गच्छगच्छाधुनेस्त्वं गलितं ते भुजद्वयम् ॥
मरिष्यसीतः परं वाऽशुद्धसङ्गो न शोभनः ॥३८॥
संत्यक्ताऽखिलधर्मोऽहं भक्ष्याभक्ष्यविवर्जितः ॥
नग्न उन्मत्तवद्वर्ते नग्ना वामेयमङ्कगा ॥३९॥

भूपैवं कुत्सितोऽस्मीह मम संसर्गदोषतः ॥
पापोत्थेनाग्निना दग्धं तव चारु भुजद्वयम् ॥४०॥

अर्थ : गर्गमुनींचे हें भाषण श्रवण करून सहस्रार्जुनाची बुद्धि भक्तीनें उत्कंठित झाली. सह्याद्रीवर येऊन योगीन्द्र श्रीदत्तात्रेयांचे मनोहर दर्शन पावून त्यास फार आनंद झाला. मी यांचा दास होणारच या निश्चयानें नित्य श्रीदत्तात्रेयांचे स्मरण करत त्यानें त्यांची आनंदानें सेवा करण्यास प्रारंभ केला. श्रीदत्तात्रेयांनी त्याचें परोपरीने निवारण केलें, हेटाळणी केली, तिरस्कार केला, परंतु पाद संवाहन, अंगसंवाह, मद्यमांस आणून देणें, स्रक, चंदन, सुगंध, फळें, इत्यदि वस्तु श्रीदत्तात्रेयांना आणून देणें, अशी सेवा अर्जुनानें एकाग्रचित्तानें, तन्मयतेने, आणि निद्रा व आळस यांचा त्याग करुन केली. राजास सेवेचें इंगित ज्ञात होते, त्यामुळे त्याने श्रीदत्तांचे उच्छिष्ट सुद्धां भक्षण केले. एकदां श्रीदत्तात्रेयांनी राजाची परीक्षा घेण्यासाठी आपल्या दृष्टीक्षेपानें राजाचे दोन्ही बाहू खांद्यापासून वेगळे करून भूमीवर पाडले. व हंसून राजास म्हटलें, "अरे आता तू येथून त्वरित निघुन जा. तुझे दोन्ही बाहू गळून पडले आहेत. यापुढे येथे थांबलास तर मरण पावशील. माझ्यासारख्या अपवित्राची संगति योग्य नाही, मी सर्व धर्माचा त्याग केलेला आहे. भक्ष्याभक्ष्याची क्षिती मी पाळींत नाही. मी नग्न असून उन्मत्तपणे वागतो आहे. आणि मांडीवरची ही स्त्रीसुद्धां नग्नच आहे. मी अशा प्रकारे निंद्य आहे. माझ्या संसर्गदोषाने व पापदोषाने निर्माण झालेल्या अग्नीमुळें तुझे सुंदर असे दोन बाहू गळून पडले आहेत. (तरी तू हे स्थान सोडून त्वरीत निघून जा.)

तच्छ्रुत्वा विस्मितो राजा स्मृत्वा गर्गवचोऽवदत् ॥
किं मां मोहयसीश त्वं वाक्यैर्लोकानुसारिभिः ॥४१॥
देव त्वमसि सर्वात्मा स्वां मायां समुपाश्रितः ॥
अनघस्त्वं तथा तेऽसौ देवी मायाऽनपायिनी ॥४२॥

येऽनीशा उभयो रूपं विज्ञातुं वामभेदतः ॥
शास्त्रैर्विधिनिषेधाभ्यां नियम्यास्ते न चापरे ॥४३॥
इत्युक्तोऽव्याजमीशस्तं प्रत्युवाच प्रसन्नधीः ॥
कार्तवीर्य महावीर्य त्वया सर्वं वशीकृतम् ॥४४॥
वरं वृणीष्व गुह्यं मे त्वया तत्त्वं समीरितम् ॥
संतुष्टस्तेन ते दास्ये दुर्लभांश्च वरान्वरान् ॥४५॥
ये मामर्चन्ति तत्त्वज्ञा विमलेनैव चेतसा ॥
तेभ्योऽभीष्टं प्रयच्छामि घातयिष्यामि चेतरान् ॥४६॥
पुलकाङ्कितसर्वाङ्गः कार्तवीर्यो ऽवदन्नतः ॥
भगवंस्त्वं प्रसन्नश्चेत्प्रदेह्यृद्धिमुत्तमाम् ॥४७॥
यथा प्रजापालनजमर्थधर्ममवाप्नुयाम् ॥
परानुस्मरणज्ञानं प्रसिद्धद्वन्द्वताऽपि च ॥४८॥

अर्थ : याप्रमाणें श्रीदत्तप्रभूंचे भाषण ऐकून राजा विस्मित झाला. तथापि श्रीगर्गमुनींनी सांगितलेली हकिगत स्मरून श्रीदत्तात्रेयांना म्हणाला, "हे परमेश्वरा, व्यावहारिक फसव्या भाषणांनी मला गोंधळांत कां बरें टाकतां? परंतु मी तुमचे स्वरूप ओळखलें आहे. हे देव, तुम्ही स्वयंप्रकाश, सर्वात्मा आहांत, आणि स्वतःच्या मायेचा आश्रय करून राहिलेले आहांत. तुम्ही अनघ, अपापविद्ध आहांत, तशीच तुमची ही मायादेवी ही कल्याणकारीच आहे, अपायकारी नाही. ती शक्ति व तुम्ही शक्तीमान् या दोघांचे अभिन्नत्वाने खरें स्वरूप जाणण्यास विधिनिषेधांनी बद्ध असे लोक समर्थ असत नाहींत. जे या बंधनांत नसतात त्यांना तुमचे रूप समजतें." या प्रकारचें अर्जुनाचें निष्कपट भाषण ऐकून श्रीदत्तात्रेय प्रसन्न चित्तानें म्हणाले, "हे पराक्रमी कार्तवीर्या, तू मला वश करून घेतले आहेस, म्हणजे सर्वच तुला वश झाले आहे. माझें गुह्य तत्व तूं जाणलें आहेस, तेव्हां मी तुझ्यावर पूर्ण संतुष्ट झालो आहे. तूं वर माग. दुर्लभ असें अलौकिक वर मी तुला देतो. जे

तत्वज्ञ केवळ शुद्ध अंतःकरणानें माझें अर्चन करतात त्यांना मी अभीष्ट प्राप्ति करून देत असतो. इतरांचा मात्र नाशच करतो." हें संभाषण ऐकून राजाच्या सर्वांगावर श्रीदत्तप्रभूंच्यावरील भक्तिमुळें रोमांच उभे राहिले, आणि तो नम्र भावानें म्हणाला, "भगवन् आपण जर प्रसन्न झाला असाल तर उत्तम अशी ऋद्धि आणि सिद्धि द्या, कीं ज्यायोगे मला प्रजापालनासाठीं अर्थ आणि धर्म या दोहोंची प्राप्ति होईल, तसेंच दुसऱ्यांनी माझें स्मरण केल्याचें ज्ञान व्हावे.

सहस्रमिच्छता मेऽस्तु बाहूनां लघिमा गुणाः ॥
असङ्गा गतयः सन्तु शैलाकाशाम्बुभूमिषु ॥४९॥
पातालेषु च सर्वेषु सर्वचित्तज्ञता सदा ॥
तथोन्मार्गप्रवृत्तस्य सन्तु मे मार्गदर्शकाः ॥५०॥
सन्तु नोऽतिथयः श्लाघ्या वसु चैवाक्षयं सदा ॥
अनष्टद्रव्यता क्वापि ममानुस्मरणेन च ॥५१॥
त्वय्यस्त्वनन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ॥
आयुष्मताऽस्तु साम्राज्यं वधः ख्यात्याधिकान्नरात् ॥५२॥
प्रभुः प्राहप्रार्थितं यत्तत्सर्वं समवाप्स्यसि ॥
त्वं मत्प्रसादाद्भविता सप्तद्वीपमहेश्वरः ॥५३॥
इत्युक्तस्तं प्रणम्याशु ययौ प्रस्थापितः पुरम् ॥
ततोऽभिषिक्तः साम्राज्ये मुनिभिः सोऽर्जुनस्तदा ॥५४॥
ततो अघोषयामास स्थितो राज्ये स हैहयः ॥
अद्यप्रभृति यः शस्त्रं मामृतेऽन्यो ग्रहीष्यति ॥५५॥
स हन्तव्यो मया दस्युः परहिंसारतोऽपि च ॥
इत्याज्ञप्तेऽभवन्राष्ट्रे सर्वे भीता नता जनाः ॥५६॥

अर्थ : माझ्या इच्छेनुसार मला सहस्र बाहु व्हावेत. शरीर हलके असावें. सर्वत्र अप्रतिहत गति असावी. पर्वत, आकाश, जल व भूमि, तसेंच

सर्व पाताल, यांमध्ये अकुंठीत गति रहावी. सर्वांच्या चित्ताचे ज्ञान असावें. मी यदाकदाचित् वाईट मार्गास वळलो तर मला योग्य मार्गावर आणणारे मार्गदर्शक असावेत. मला पूज्य अशा अतिथींचा लाभ होत रहावा. माझे भांडार धनधान्यांनी अक्षय परिपूर्ण रहावें, आणि माझें स्मरण करणाऱ्याचें नष्टद्रव्य पुनः प्राप्त व्हावें. हे श्रीदत्तात्रेया, तुझ्या ठिकाणीं माझी अनन्य व अव्यभिचारीणी भक्ति सतत रहावी. मला खूप आयुष्य असावें व शेवटी माझा मृत्यु माझ्यापेक्षा श्रेष्ठ अशा नराकडूनच व्हावा. " हें अर्जुनाचें भाषण ऐकून श्रीदत्तात्रेय म्हणाले, " तूं जें जें मागितलें आहेस त्या सर्वांची प्राप्ति तुला होवो, आणि माझ्या कृपेने तू सप्तद्वीपांचा सम्राट होशील. " हें ऐकून राजानें श्रीदत्तात्रेयांना नम्रभावानें वंदन केलें व तो त्वरेनें आपल्या नगराकडे गेला. नंतर मुनींनीं अर्जुनास साम्राज्यपदी अभिषेक करून बसविलें. राज्यावर आरूढ झाल्यावर अर्जुनाने डांगोरा पिटवून सर्व राज्यभर ग्वाही फिरविली कीं " आजपासून माझ्याशिवाय कोणीही शस्त्र धारण करावयाचें नाहीं. तसें केल्यास मी त्याचा वध करीन. तसेंच परहिंसा करणाऱ्याचाही वध केला जाईल. " अशी ग्वाही फिरविल्यावर सर्व जन घाबरले आणि नम्रतेने राजाज्ञा पाळूं लागले.

क्षेत्रपालो ग्रामपालः पशुपालः स एव च ॥
तपस्विविप्रपालोऽर्थधान्य सेनापतिः स च ॥५७॥
दस्युव्यालाग्निशस्त्रारि भयेषूच्चैर्निमज्जताम् ॥
समुद्धर्ता सदाऽऽपत्सु सर्वेषामखिलास्वपि ॥५८॥
संस्मृतो बहुधा योऽभूद्योगेनात्मैव मायया ॥
अनष्टद्रव्यताऽरोग्यं तस्मिञ्छासति चाभवत् ॥५९॥
इन्द्रोऽवर्षद्यथाकामं भूश्चात्र सुफलाऽभवत् ॥
तेनेष्टं बहुभिर्यज्ञैः सौवर्णवरदक्षिणैः ॥६०॥
त्रैलोक्ये संचचाराऽसौ माहिष्मत्यां वसन्नपि ॥
पञ्चाशीतिसहस्राब्दं सप्तद्वीपां शशास गाम ॥६१॥

तीव्रप्रतापस्तेजस्वी स सहस्रकरोऽर्कवत् ॥
अधर्मकारिणो हत्वा स्वयं धर्मं चचार सः ॥६२॥

अर्थ : राजा अर्जुन अनेक रुपांनी प्रजेचा पालनकर्ता झाला. क्षेत्रपाल, ग्रामपाल, पशुपाल, तपस्वी, वीप्र, यांचा पालनकर्ता, द्रव्य आणि सेना यांचा मालकही झाला. चोर, सर्पादि हिंस्र प्राणी, अग्नि, शस्त्र, शत्रू, एवढेच काय कोणत्याही संकटाचें भय, पडल्यावर त्या संकटातून प्रजाजनांना वर काढणारा समर्थ असा तोच होता. इतरांनी कोठेही स्मरण केले असता तो योग-सामर्थ्याने अनेक रूपें धारण करीत सर्वत्र संचार करीत असे. तो राज्य करीत असताना गेलेले द्रव्य पुनः प्राप्त होई व सर्वांना आरोग्य प्राप्त होत असे. इंद्र अपेक्षेप्रमाणे पर्जन्य पाडीत होता व भूमि धनधान्य संपत्तीपूर्ण होई. सहस्रार्जुन राजाने अनेक यज्ञयाग करून सुवर्ण दक्षिणा दिली. माहिष्मति नगरीत स्वतः वास्तव्य करूनही अनेक रूपें धारण करुन त्रैलोक्यात संचार केला. आणि सप्तद्विप पृथ्वीचें राज्य पंचाऐंशी हजार वर्षेपर्यंत केले. तो सूर्याप्रमाणे सहस्रबाहुंच्या योगे पराक्रमाने तळपत राहून अधर्माचरणी लोकांचा नाश करुन स्वयं धर्माचरण करून संचार करीत असे.

अनघां चानघं माघकृष्णाष्टम्यां प्रपूज्य सः ॥
षण्मन्त्रैर्वैष्णवे विप्रान्भोजयित्वा प्रजागरम् ॥६३॥
कृत्वा रात्रौ परेद्युर्विने समापयति स व्रतम् ॥
कोऽप्यानघव्रतमिदं कुर्यात्सोऽपि समृद्धिभाक् ॥६४॥
यस्मिन्दिने वरो लब्धस्तद्दिने स महोत्सवम् ॥
चक्रे शश्वद्दर्शनं च विभोर्नित्यं हृदिस्मरन् ॥६५॥
न नूनं कार्तवीर्यस्य गतिं यास्यन्ति पार्थिवाः ॥
यज्ञदानतपोयोगश्रुतवीर्यजयादिभिः ॥६६॥
दुर्धर्षः क्वापि तेजस्वी बलौजोवीर्यकीर्तियुक् ॥
अनष्टचित्तस्मरणो बुभुजेऽक्षय्यसत्सुखम् ॥६७॥

रावणो राक्षसेशोऽपियेन बध्दोऽपि लीलया ॥
श्रीदत्तप्रार्थनया मुक्त एवंभुतोऽर्जुनोऽभवत् ॥६८॥

अर्थ : माघकृष्णाष्टमीस अनघा अशा शक्तीची व श्रीदत्तात्रेयांची पूजा 'अतो देवा' इत्यादि सहा वैष्णवमंत्रानी करून विप्रांना भोजन देऊन, रात्री जागरण करून, राजा दुसऱ्या दिवशी व्रतसमाप्ति करीत असे. जो कोणी हे अनघव्रत करील त्यालाहि समृद्धि प्राप्त होईल. राजाला ज्या दिवशी श्रीदत्तात्रेयांकडून वरप्राप्ति झाली त्या दिवशी दरवर्षी तो महोत्सव करीत असे. नित्य श्रीदत्तात्रेयांचे हृद्यात स्मरण व दर्शन करीत असे. खरोखर यज्ञ, दान, तप, योग, ज्ञान, पराक्रम, जय या बाबतींत कोणीही मानव सहस्रार्जुनाची बरोबरी करूं शकणार नाही. आपल्या तेजाचेमुळे राजा कोणासही न आवरणारा आणि बल, तेज, वीर्य आणि कीर्तीने युक्त असा होता. सतत श्रीदत्तात्रेयांचे स्मरण ठेऊन त्याने अक्षय्य सुख भोगले. त्याने राक्षसराज रावणाला लीलेने बांधून टाकले होते, परंतु कुबेराने विनंति केल्यामुळे राजाने रावणास मुक्त केले. अशा प्रकारे सहस्रार्जुनाचा महिमा होता.

॥ इति श्रीदत्तपुराणे तृतीयाष्टके चतुर्थोऽध्यायः ॥

॥ अथ शिल्पकामशास्त्रयोर्गतिनाम तृतीयाष्टके पञ्चमोऽध्यायः ॥

हरिः ॐ॥ वैश्वानरसमो राजा प्रतापेनापि दुर्धरः ॥
यं यं प्राप्तमुपादत्ते श्रीदत्तात्रेयसंनिधौ ॥१॥
नमस्कृत्य पुनर्याति कदाचिन्निवसत्यपि ॥
कदाचिध्दर्मशास्त्राणि शृणोत्येवं प्रियोऽभवत् ॥२॥
एवं सन्नेकदा राजा निर्विण्णो मनसा भृशम् ॥
तत्त्वजिज्ञासया देवमुपतस्थे कृताञ्जलिः ॥३॥
देवोऽपि तत्परीक्षार्थं समाधिस्थ इवाभवौ ॥
युक्तं चैतद्गुरूणां हि शिष्यधीदार्ढ्यहेतवे ॥४॥

कर्मणा मनसा वाचा सर्वभावार्पणेन च ॥
सेवमानो हृषीकेशं स्थितो राजातिभक्तितः ॥५॥

अर्थ : ह्या अध्यायांत विरक्त झालेल्या अर्जुनाकरतां सात गाथा सांगून, शिल्पशास्त्र व कामशास्त्र जाणणाऱ्यांना उत्तम गति कशी मिळाली तें सांगितलें आहे. असो. कार्तवीर्य अर्जुन अग्निसारखा तेजःपुंज व प्रतापानें अनिवार्य असा असूनही, त्याची श्रीदत्तात्रेयांवर पूर्ण भक्ति होती. तो नेहमीं श्रीदत्तात्रेयांच्या दर्शनासाठीं येत असे, व नमस्कार करून जात असे. कधी-कधी त्यांचे सन्निध रहातही असे, व त्यांचेकडून धर्मशास्त्रांचे श्रवण करीत असे. अशा रीतीनें तो श्रीदत्तात्रेयांचा प्रिय झाला. असे असतां एकदां राजा अतिशय खिन्न मनाने तत्त्वजिज्ञासेनें श्रीदत्तात्रेयांकडे गेला व हात जोडून उभा राहिला, व त्यांची मनोभावे पूजा केली. श्रीदत्तात्रेयांनी त्याच्या परिक्षेसाठीं समाधि घेतल्यासारखे दाखविलें. गुरूंना हे युक्तच आहे कीं शिष्याच्या अंतःकरणाची दृढता पहाण्यासाठी असे करावे. राजाने आपल्या कर्माने मनाने वाणीने व सर्वभाव अर्पणाने अतिशय भक्तिने देवाची सेवा आरंभिली.

त्यक्तोदमपि तं खिन्नं स्तुवन्तमपि सूक्तिभिः ॥
प्रणन्तमभीष्णं नो धियाप्याश्वासयत्प्रभुः ॥६॥
यत्रास्तेऽचिज्जगद्भ्रान्तिः स्वप्नाभाव्यसती सतिः ॥
अलातचक्रवल्लोला मायिका यत उत्थिता ॥७॥
तां विद्वान् ज्ञानखड्गेन यतात्मा सन्महाव्रतः ॥
छित्वा सदुक्तितीक्ष्णेन क्षिप्रं संयाति यत्पदम् ॥८॥
तं त्वां त्र्यधीशं गोविन्दं मुमुक्षुः प्रणतोऽस्म्यहम् ॥
नित्यमुक्तेश सर्वज्ञ बद्धं मां शिव पाह्यज ॥९॥
ओतं प्रोतमिदं यस्मिन्त्रसते तन्तवो यथा ॥
प्रपद्ये सच्चिदानन्दं तं त्वां नारायणं परम् ॥१०॥
बिलाविष्टं कुसौख्योरुतर्षं मां कृपयोद्धर ॥
कालाहिदष्टमवशं स्मृत्यैवाश्वेहि भो हरे ॥११॥

अर्थ : राजाने अन्नोदक वर्ज्य केले, व खिन्न होऊन श्रीदत्तात्रेयांची अनेक प्रकारें स्तुति केली. श्रीदत्तात्रेयांच्या कृपाकटाक्षासाठीं राजा वारंवार नमस्कार करीत होता, परंतु त्यांनी त्याच्याकडे पाहिलेही नाही. राजानें खालील प्रमाणे स्तुति केली, हे देवा, तुझ्या स्वरूपाधिष्ठानावर जड जगताची भ्रांति होते. (स्वप्नांतील जगताप्रमाणे) जसे हातांत कोलीत घेऊन फिरविले म्हणजे अग्निचक्राचा भास होतो त्याप्रमाणे मायिक जगाचा भास होतो. ज्ञानी व विद्वान् मनुष्य प्रयत्नपूर्वक ज्ञानरूपी खड्गानें व स्वतः प्रमाणभूत वेदांच्या मदतीने किंवा उपनिषद्रूपी सद्गुरूंच्या उक्तींच्या आधारे त्या भ्रांतीचा नाश करतो व सत्वर परब्रह्मपदी पोचतो. असे अढळ ज्याचे पद त्या तुला त्रिगुण-मायानियन्त्यास, गोविंदास, मुमुक्षु असा मी नम्रभावे प्रणाम करीत आहे. हे नित्यमुक्ता, सर्वव्यापका ईशा, सर्वज्ञा, शिवा, अजा, मायेने बद्ध अशा माझे तूं रक्षण कर. योग्य अशा गुरूंकडे जा, असे जर म्हणत असाल त्यावर माझे म्हणणे असे की वस्त्रांमध्ये जसें आडवे उमे एकच तंतू भरलेले असतात त्याप्रमाणे चराचर सृष्टीस तुम्हीच व्यापून टाकलेले आहे. म्हणून नारायण स्वरूप अशा तुम्हासच मी शरण आलो आहे. कुत्सित अशा बिलस्वरूप संसारांत मी सापडलो आहे. विषयसौख्याच्या कामवासनेने मी पीडलेलो आहे. मी प्रकृतिपरतंत्र असून, कालरूपी सर्पाने मला दंश केला आहे. तरी तावड-तोब येऊन माझा उद्धार करा.

कस्तेऽर्हतीह तं ज्ञातुं वाङ्मनोऽगोचरं परम् ॥
ब्रह्माद्या मोहिता यत्र तत्राहं दुर्मतिः कियान् ॥१२॥
तापतप्तं भवाटव्यां अनन्यं मरणोन्मुखम् ॥
दृष्ट्वा मां दीनमेही त्वमन्वर्थत्वं दयाघन ॥१३॥
मुमुक्षोस्तेऽवतारोयं ज्ञानविज्ञानयोगदाः ॥
उद्धारकोस्त्यतोऽधीश सर्वात्मन्पाहि माऽधुना ॥१४॥
स्त्रीपुत्रार्थसुहृद्राज्यभोगा मायामया हि तेः ॥
स्वरूपाच्छादकैः किं मे सर्वत्रौद्वेगदैः सदा ॥१५॥

भवचक्रं विनात्युग्रं न बिभेमि रिपोर्यमात् ॥
तीक्ष्णदण्डादपि पंचभूतभौतिकतोऽप्यज ॥१६॥
देहितचक्रभङ्गाय निवासं त्वत्पदाम्बुजे ॥
येनानन्दाश्रुसान्द्रोऽहं यास्यामि विभवः शमम् ॥१७॥

अर्थ : तुम्ही जर म्हणत असाल कीं मी समाधि लावून बसलो असता तू माझ्याकडे येऊन काय विचारीत आहेस ? लोकव्यवहार तरी तुला कळतो कां ? तर यावर माझें उत्तर असें कीं तुमची वाणी व मन यांस समजण्यास, कठीण असे खरें रूप जाणण्यास कोण बरे समर्थ आहे ? ब्रह्मादिक-सुद्धां जेथें मोहित झाले तेथें माझा काय पाड ? तेव्हां संसाररूपी त्रिविध तापांनी पोळला जाणाऱ्या अनन्य, मरणोन्मुख अशा माझ्याकडे येऊन, हे दयाघना, आपले ' दयाघन ' हे नांव सार्थ करा. मुमुक्षु जीवांना ज्ञान विज्ञान व योग देणारा व त्यांचा उद्धार करणारा तुझा हा अवतार आहे. म्हणून मुक्तीची इच्छा करणाऱ्या माझे तूं रक्षण कर, अविद्याकामकर्मांपासून मला वाचव. स्त्रीआदि सुखोपभोगांनीं युक्त असा हा संसार कां टाकण्याची इच्छा करतोस असे विचारीत असाल, तर त्याचें उत्तर असें कीं, स्त्री, पुत्र, स्नेही, राज्य भोग वगैरे सर्व गोष्टी मायामय आहेत. त्यांनी आत्म्याचे सुखमय सत्यस्वरुप झांकून टाकलेलें आहे. त्यांपासून सदैव उद्वेगच प्राप्त होतो. त्यांचा मला काय उपयोग आहे ? मी ह्या भवचक्राला जितका भितो, तितका यमाच्या तिक्ष्ण दंडालाही भीत नाहीं, किंवा इंद्रवज्रालाही नाहीं. तसेंच भूत व भौतिक-बाधाही मला सोसवतील. तेव्हां हे परमेश्वरा, त्या भवचक्राच्या भंगासाठी तुझ्या चरणकमलीं मला निवास दे. त्यायोगें मी आनंदनिर्भर होईन व मला शाश्वत शांतिलाभ होईल.

उचितोऽर्थप्रसङ्गोऽयं त्वत्पादविमुखेऽनलः ॥
त्वत्पादभक्ते सारज्ञे स कथं सुखयत्यसन् ॥१८॥
नात्रामुत्रापि भोगेच्छा प्रसादात्ते ममाधुना ॥
वासनारूढदुर्योगवियोगं योगमादिश ॥१९॥

धन्योऽत्रिरनसूयापि यत्प्रसादाद्भवत्पदम् ॥
अभवं वेदमृग्यं तज्जातं सुलभमत्र तु ॥२०॥

नमस्ते वासुदेवाय पुराणपुरुषोत्तम ॥
विश्वाध्यक्ष हृषीकेश भक्ताधिव्याधिमर्दन ॥२१॥

अर्थ : हे दत्तात्रेया; आतां उपलब्ध असलेल्या विषयांचा त्वरेने उपभोग घे, परमार्थाचें नंतर पहाता येईल. असे म्हणत असाल तर त्यावर माझे उत्तर असे की विषयोपभोगाच्या सेवनानें तृप्ति कधीच होत नाही. त्यांचा उपभोग पुरे, असें कधीच वाटत नाही. ' न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ॥ हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते । हें स्मृतिवचनच आहे. तसेंच विषयोपभोग हे मृगजलसम आहेत. तुझ्या पदांपासून जे विमुख आहेत त्यांना विषय मेडसावतात. परंतु तुझ्या चरणकमळाचे भक्त असणाऱ्या तज्ञाना त्यांपासून सुख वाटत नाही. विवेकी मनुष्य जरी असला तरी त्याला जोवर वैराग्य प्राप्त होत नाही तोवर उपदेश करू नये, या उद्देशानें, मी वैराग्ययुक्त नाही, असें समजून जर म्हणत असाल तर, माझें तसें नाहीं. मला या जगांत अथवा अन्य लोकांत कोणतीही भोगेच्छा आपल्या कृपा प्रसादाने उरलेली नाही. तेव्हां वासनेवर आरुढ होण्याने जो दुर्योग निर्माण होतो, त्याचा वियोग घडविणारा जो योगमार्ग, त्याचा मला कृपा करून उपदेश करावा. हे परमेश्वरा, धन्य ते अत्रिमुनी व धन्य ती सती अनसूयामाता, की ज्यांच्या केवळ कृपा प्रसादामुळे आपले संसारनिवर्तक, वेदगम्य असे रूप या भूमितलावर सुलभपणे दृश्य झाले आहे. हे वासुदेवा, सर्वकारणकारणा, पुराणपुरुषा, पुरुषोत्तमा, विश्वाध्यक्षा, हृषीकेशा, भक्तांच्या आधीव्याधींचा नाश करणाऱ्या, तुला माझा नमस्कार असो.

एवं स्तुत्वाऽभवत्तूष्णीं सिद्धा अत्रान्तरेऽमिताः ॥
ब्राह्मे मुहूर्त एत्येशं नत्वा जग्मुर्विमानगाः ॥२२॥

सगन्धर्वाप्सरोदेवास्तदैवैत्य प्रणम्य तम् ॥
परिक्रम्य ययुर्विप्रा मुनयोऽपि तथामिताः ॥२३॥

समृज्जलः शान्ततपा उषस्यापोत्थितः प्रभुः ॥
राक्षस्याशां ययौ मौनी विमलः पुनरागतः ॥२४॥
समृज्जलसमित्तावत्प्राप्तोऽन्यो मुनिरीश्वरः ॥
कृतशौचोऽम्भसि स्नात्वा देवर्ष्यादीनतर्पयत् ॥२५॥
सवल्कभस्मदर्भोऽन्यस्तावत्प्राप्तो यथाविधि ॥
कृत्वाह्निकं विभुस्तस्थौ ध्याननिश्चलदृष्टिवत् ॥२६॥
स्थितः खिन्नोऽभवद्राजा ततः शान्ततपा जगौ ॥
भक्तोऽयं धार्मिकः खिन्नो राजोपेक्षास्य नोचिता ॥२७॥

अर्थ : वरीलप्रमाणें स्तुति करुन अर्जुन स्तब्धपणें उभा राहिला. नंतर पुष्कळ सिद्ध ब्राह्म मुहूर्तावर तेथें आले, त्यांनी श्रीदत्तात्रेयांना नमस्कार केला, व विमानांत बसून निघून गेले. तसेच गंधर्व, अप्सरा आणि देवगणांनी तेथें येऊन श्रीदत्तात्रेयांना नमस्कार करुन प्रदक्षिणा घातली. अनेक विप्र व मुनींनीही तसेंच केलें. नंतर शांततपा नांवाचा मुनि मृत्तिका व जल घेऊन पहाटेच आश्रमांत आला. त्याचेजवळील जलमृत्तिका घेऊन श्रीदत्तात्रेय नैऋत्य दिशेस गेले. त्यावेळी त्यांनी मौन धारण केलें होतें. नंतर शुद्ध होऊन पुन्हा आले. त्यानंतर मृत्तिका, जल व समिधा घेऊन दुसरा मुनि आला तेव्हा श्रीदत्तात्रेयांनी यथाविधि शुद्ध होऊन जलस्नान करून देव, ऋषि यांचे तर्पण केले. तितक्यांत एक मुनि वल्कल, भस्म व दर्भ घेऊन आला, तेव्हा यथाविधी अह्निक करून श्रीदत्तात्रेय ध्याननिश्चल दृष्टि ठेऊन शांतपणे बसले. तो पर्यंत राजा अर्जुन तसाच खिन्नपणे दीनवत् बसून राहिलेला होता. ते पाहून शांततपा प्रभूंकडे जाऊन म्हणाला, " हा राजा आपला परम भक्त असून धार्मिक आहे. आपण याची उपेक्षा न करतां याचर कृपादृष्टि करावी."

प्रहस्याह प्रभुः सम्राट् समृद्धः खिद्यसे कुतः ॥
कां भूतिमिच्छस्यप्राप्तां किं मद्भक्तस्य दुर्लभम् ॥२८॥
साश्रुनेत्रोऽवदत्सम्राडनयालं परीक्षया ॥
प्रशंसन्तीह योग्याय योग्यं दानं मनीषिणः ॥२९॥

तृषितेऽम्भोऽन्नं क्षुधिते दानं दीनेऽवनं तथा ॥
आर्ते योग्यं तथा ज्ञानं मुमुक्षौ वेत्सि सर्ववित् ॥३०॥

वाङमनोऽगोचरं शुद्धं ब्रह्मैकं सदसत्परम् ॥
वेदान्ती प्राह दृश्यं च मायिकं रज्जुसर्पवत् ॥३१॥

प्राहान्योऽनादि तत्सत्यं मिथ्या चेद्दृश्यते कथम् ॥
उत्तमत्वादिकं त्वस्य कर्मणैवापरेऽब्रुवन् ॥३२॥

नानात्मत्वं जगुश्चान्ये प्रधानं कारणं परम् ॥
निमित्तं द्वंद्वजं चान्ये क्षणिकत्वं परेऽस्य च ॥३३॥

युक्त्या स्वपक्षदार्ढ्यार्थं वेदादीन्योजयन्त्यपि ॥
युक्तं किमत्र भगवन्भ्रमशान्त्या उपादिश ॥३४॥

मच्छासनं त्वत्प्रसादात्सर्वत्राव्याहतं द्विषः ॥
भृत्या मे वासना कापि न मे मोक्षादृतेऽधुना ॥३५॥

अर्थ : शांततपा मुनीचें भाषण ऐकून श्रीदत्तात्रेय अर्जुनास म्हणाले, "तूं सम्राट असून, सर्व साधन संपत्तीनें युक्त असूनही कोणत्या कारणानें खिन्न झाला आहेस ? कोणती सिद्धी किंवा समृद्धि तुला अप्राप्त आहे ते सांग. तीही तात्काळ देतो. माझ्या भक्तास कांहीही दुर्लभ नाही." हे ऐकून राजा साश्रु नयनांनी म्हणाला, "हे प्रभो, माझी अशी परीक्षा यापुढे करूं नये. योग्यास योग्यच द्यावे असे विद्वान् म्हणतात. तृषिताला पाणी, क्षुधितास अन्न, गरीबास दान, आर्त माणसास रक्षण, तसेच मुमुक्षूंस ज्ञान हे शास्त्रगम्य आहे असे म्हणावे तर तर्कानुगृहीत सच्छास्त्रावाचून केवळ शास्त्र ज्ञानजनक असत नाही. तसेच निरनिराळ्या शास्त्रांची मते वेगवेगळी आहेत. "ब्रह्म हे वाणी, मन यांना अगोचर आहे. पण ते मायायोगाने सत् व असत् असे उभयविध भासते" (ज्याप्रमाणे रज्जूवर सर्पाची भ्रांती होते त्याप्रमाणे) असे वेदांती मानतात. "जगत् हे अनादि असून ते सत्य आहे. मिथ्या असते तर दिसले कसे असते ?" असे कांहींचे मत आहे. "जगताचे उत्तमत्व कर्मामुळेच

आहे" असें मीमांसक म्हणतात. नानात्व हें जगाचें मुख्य कारण आहे असे सांख्यमत आहे. जगत् ब्रह्म हे द्वंद्वज आहे असे क्षणिकवादी म्हणतात. असे अनेक पक्ष युक्तिवादाने आपआपले म्हणणे खरे दाखविण्यासाठी वेदांचा आश्रय घेतात. तेव्हां यामध्ये योग्य मत कोणते ते माझ्या भ्रमनिरासासाठीं कृपा करून सांगावें. प्रभो, आपल्या कृपेनें माझें राज्य अगदीं निष्कंटकपणें चालले आहे. शत्रुसुद्धां माझे चाकर होऊन राहिले आहेत. आतां मला मोक्षाशिवाय दुसऱ्या कशाचीही इच्छा नाहीं.

यथा कयापि युक्त्या मामुत्तारय भवाम्बुधेः ॥
ब्रह्मादीनामपि ब्रह्मन् त्वमेवास्यपरो गुरुः ॥३६॥

भगवान्प्राह शास्त्राणामेकं तात्पर्यमीरितम् ॥
बृहस्पतीन्द्रसंवादं श्रुणु संशयभेदकम् ॥३७॥

लौकायतस्माराशिल्पसौगतादिश्रुतान्यपि ॥
पाठ्यन्तं स्वशिष्येभ्यो गुरुं नत्वा वृषाऽवदत् ॥३८॥

जात्यैव प्राणिनां प्राप्ता रागतो विषयात्मता ॥
एतैरर्थात्मकैः शास्त्रैः किं विधेयं विपश्चिता ॥३९॥

विषयाक्रान्तचित्तानां किं तत्तत्त्वबहिर्मुखैः ।
किं विद्वान् लभतेऽत्राज्ञं कूपेऽन्यमिव पातयन् ॥४०॥

गुरुः प्राह क्रमादेतैश्चित्तशुद्धिर्भविष्यति ।
सप्तोदाहरणान्यत्र संशयान्तानि मे श्रुणु ॥४१॥

कापिल्ये शिल्पवित्कश्चिद्विधिज्ञाख्यः पुरेऽभवत् ।
गृहान्त्स निर्ममे कान्तांश्छिल्पशास्त्रोक्तवद्बहून् ॥४२॥

गृहकर्मणि तं सर्वे मान्यं वाञ्छति वेतनम् ।
भूरि प्रायोपजीवन्ति तमेवान्ये स सत्यवाक् ॥४३॥

अर्थ : "हे भगवन् कोणत्याही युक्तीनें मला या भवसागरांतून वर काढा. हे प्रभो, तुम्ही ब्रह्मादिकांचेही सर्वश्रेष्ठ गुरू आहांत." भगवान् म्हणाले,

अर्जुना, सर्व शास्त्रांचे तात्पर्य एकच आहे. तें समजावून घेण्यासाठीं बृहस्पति व इंद्र यांचा संवाद ऐक. त्यानें तुझ्या मनांतील संशय दूर होईल. बृहस्पति आपल्या शिष्यांना लौकायत म्हणजे प्रत्यक्षैकप्रमाण चार्वाकमत, स्मार म्हणजे वात्स्यायनोक्त कामशास्त्र, शिल्प, सौगत म्हणजे शून्यवादिशास्त्र, वैशेषिक, न्याय इत्यादि शास्त्रें पढवीत असतां त्यांचेकडे जावून इंद्र नमस्कार करून त्यांना म्हणाला, "प्राण्यांना जन्मापासून संस्कारवशतेमुळें विषयांची गोडी लागलेली असते. तेव्हां विद्वान् व ज्ञानी माणसाला सुद्धां ह्या अर्थात्मक शास्त्रांचा काय उपयोग आहे? विषयाक्रांत ज्याचे चित्त आहे त्यांना या तत्वांचा काय उपयोग आहे? आणि येथें अज्ञाला, जसें अंधाला कूपांत टाकावें त्याप्रमाणे शास्त्रांच्या जंजाळांत टाकून विद्वान काय मिळवितो?" इंद्राच्या ह्या प्रश्नावर बृहस्पती म्हणाले, "ह्या शास्त्राच्या श्रवणाने क्रमाक्रमानें चित्तशुद्धि होते. या संबंधी तुझा संशय नाहींसा करणारी सात उदाहरणे सांगतो ती ऐक. पूर्वी कापिल्य नगरांत विघिज्ञ नांवाचा कोणी एक शिल्पज्ञ रहात होता. तो पुष्कळ सुंदर अशी घरें शास्त्रोक्त रीतीनें बांधत असे. तो सर्वमान्य असून त्यास खूप वेतनाची अपेक्षा असे. अन्य लोकांनाही त्याच्याकडून काम मिळत असे. तो सत्यवचनी होता.

मृतस्ततोऽगात्स्वर्गं स भोगान्भुक्त्वाभवन्नृपः ॥
यज्वा स भूतले देवगृहवापीतडागकृत् ॥४४॥
धार्मिकः स मृतः स्वर्गे भोगान्भुक्त्वा द्विजोऽभवत् ॥
वेदशास्त्रार्थतत्त्वज्ञो ध्याननिष्ठो महाव्रतः ॥४५॥
चतुर्थाश्रममासाद्य जीवनमुक्तश्चचार गाम् ॥
शास्त्रं धीशुद्धिकृद्यस्माच्छिल्पज्ञोऽगात्क्रमाद्गतिम् ॥४६॥

अर्थ : तो शिल्पज्ञ कालांतरानें मरण पावला व स्वर्गांत अनेक भोग भोगून पुन्हा राजा म्हणून जन्मास आला. राजा असतांना अनेक यज्ञ केले, धार्मिकपणे देवळें, विहिरी व तळी बांधली, आणि मृत्यु पावल्यावर पुन्हां स्वर्गभोग भोगून ब्राह्मण म्हणून जन्मास आला. ब्राह्मणजन्मी तो वेदशास्त्र तत्वज्ञ, ध्याननिष्ठ व अहिंसादि व्रते पाळणारा असा झाला. नंतर

संन्यास ग्रहण करून जीवन्मुक्त अवस्थेंत त्यानें पृथ्वीवर संचार केला शास्त्र हें क्रमानें बुद्धिशुद्धि करत असल्यानें शिल्पज्ञाला अशारीतीनें क्रमानें गति प्राप्त झाली.

माहिष्मत्यां द्विजः कश्चिद्गीतवादित्रवित्कविः ॥
सुन्दरः कामशास्त्रज्ञो भार्यार्थं क्ष्मां चचार सः ॥४७॥
तद्भावज्ञो नृपः कश्चित्तस्मै कन्यां व्यदर्शयत् ॥
शास्त्रोक्तसर्वलक्ष्माढ्यां दृष्ट्वोच्चैर्मूर्च्छितोऽभवत् ॥४८॥
सापि तं चकमे कान्तं हृष्टो राजा स तां ददौ ॥
राज्यार्धमपि तस्मै स द्विजो रेमे तयासह ॥४९॥
[illegible]दात्मनो रूपं सर्वेहोपरतौ स्फुटम् ॥
वाङ्मनोऽगोचरं नित्यं श्रेष्ठमात्यंतिकं परम् ॥५०॥
मनुष्यानन्दमारभ्य ब्रह्मानंदान्तमेव यत् ।
दशोत्तरगुणं तत्तु ब्रह्मानंदांशतो गतम् ॥५१॥
वृत्त्यारूढंच तत्पूर्णं भाव्यते रतिकर्मणा ।
विघिज्ञेन न मूर्खेण तत्सौख्यं सोऽलभत्सदा ॥५२॥
पत्नी नान्यं हृदाप्यैच्छत्तस्याभूद्हृद्धरा सती ।
रेमे तयैव गीतज्ञो विश्रब्धितानुरूपया ॥५३॥
चक्रे वित्तानुसारेण नित्यनैमित्तिकाः क्रियाः ॥
यथारुचि यथाकालं दिव्यार्थान्बुभुजे स च ॥५४॥

अर्थ : (यानंतर बृहस्पति दुसरी कथा सांगतात.) महीष्मती नगरींत कोणीएक ब्राह्मण रहात होता. त्यांस गीत व वाद्यें अवगत असून तो कवीहि होता. तो सुंदर असून कामशास्त्रांत पारंगत होता. भार्येसाठी तो पृथ्वीवर संचार करीत असतां एका राजानें त्याचे मनोगत ओळखून त्यांस शास्त्रोक्त लक्षणांनी युक्त अशी कन्या दाखविली. तेव्हां ती सर्वयुक्त लक्षण कन्या पाहून ब्राह्मण मोहीत झाला व काममूर्च्छित झाला. त्या राजकन्येलाही आपल्यालाही हाच

पति असावा असें वाटलें. तेव्हां राजाने अर्धे राज्य व कन्या त्यांस आनंदाने दिली. तो ब्राह्मण आनंदाने त्या राजकन्येसह रमूं लागला. जें जें म्हणून सुख वाटतें ते आत्म्याचेच रुप आहे. सर्व इंद्रिये प्राण व अंतःकरण यांच्या क्रियांच्या शांतीमध्यें तें व्यक्त होते. तें निरुपाधिक त्यामुळे मन, वाणि यांना अगोचर आणि म्हणून निरतीशय असते. मनुष्यानंदापासुन ब्रम्हानंदापर्यंत सुखाभास दशपटीने उत्तरोत्तर वाढत जातो. प्रथमतःस्त्रीपुरुषसंयोगजन्य सुख कामवासनावृत्तीमध्यें उत्पन्न होतें. शुक्रद्राव झाल्यावर रतीनंतर पूर्ण सुखाचा आभास होतो. परंतु ते सुख सोपाधिक म्हणजे क्षणिक, लज्जायुक्त, असेंच असतें. परंतु रतिकर्माचें शास्त्र जाणणारा शहाणा मनुष्य शाखाचन्द्रन्यायाने रतिसुखाचा आश्रय करून परमानंद निश्चित मिळवितो. मूर्खांना मात्र तसा लाभ मिळत नाहीं. त्या ब्राह्मणानें मात्र ब्रह्मानंदाची प्राप्ति करून घेतली. त्याची पत्नी मनांतूनसुद्धां अन्य कोणा पुरूषाची इच्छा करीत नसे. ब्राह्मणाची ती आवडती असल्यानें तो तिच्याशीच आनंदाने रमत असे. जवळ असलेल्या धनानुरूप तो नित्यनैमित्यिक क्रिया यथारुचि व यथाकाल करून त्यानें दिव्य भोग भोगले.

नश्रुतं नानुभूतं च ताभ्यामंहोऽल्पमप्यकम् ॥
दैवात्प्रेत्य स सस्त्रीको गन्धर्वेशोऽभवत्सुधीः ॥५५॥

तत्रैव नादवित्सोऽपि चार्व्या पत्न्या सदाऽरमत् ॥
तन्व्या सर्वकलाभिज्ञो विधिना रमयन्सुरान् ॥५६॥

हिमाचलवने रम्ये कदाचिच्छिवया शिवः ॥
उच्चैर्गायन्तमाकर्ण्य सुस्वरं तमवाप सः ॥५७॥

नत्वेशं सह पत्न्या स नादज्ञो मन्जुलस्वरः ॥
गीतैरतोषयत्प्राह मौलिमान्दोलयञ्छिवः ॥५८॥

सुशिक्ष्योऽस्यद्ययावन्मे श्रुतं नेदृङ्मनोरमम् ॥
धन्योसि त्वं दिवं याहि भुंक्ष्व भोगान्सुदुर्लभान् ॥५९॥

ततो लब्धवरो गत्वा विमानेन दिवं स तु ॥
त्वदादीन्रमयामास सुगीतैर्भार्यया सह ॥६०॥

कदाचिद् ब्रह्मलोकेऽभून्महोत्सवोऽखिलाः सुराः ।
संप्राप्तास्तत्र सदसि गन्धर्वाप्सरसो जगुः॥६१॥

अर्थ : त्या दांपत्याने पाप अगर दुःख याबद्दल कधीं ऐकलेही नाही अगर अनुभव घेतला नाही. मृत्युनंतर सुबुद्ध अशा त्याला स्त्रीसह गंधर्वराजाचा जन्म प्राप्त झाला. तेथे सुद्धा संगीतादिकलाभिज्ञ असा तो सुंदर अशा पत्नीसह सदा रमूं लागला. सर्व कलांत पारंगत असल्याने त्याने देवांना विधियुक्त रीतीने आनंद दिला. एकदां शिवपार्वती हिमालयांतील वनांत बसले असतां उच्च स्वरांतील त्याचे सुस्वर गायन ऐकून त्याचे समीप आले. शिवपार्वती पाहून गंधर्वराजाने पत्नीसह उभयतांस भक्तीभावाने नमस्कार केला. नंतर संगीततज्ञ अशा त्याने मंजुळ स्वराने गायन करून शंकरास संतुष्ट केले. शंकरांनी मान डोलावून म्हटले, "तूं संगीतशास्त्रांत पारंगत आहेस. आतां तूं स्वर्ग लोकांत जा व अत्यंत दुर्लभ असे भोग भोगीत रहा." याप्रमाणे वर मिळवून तो गंधर्वराजा विमानाने भार्येसह स्वर्गलोकांत गेला, आणि तुझ्यासह सर्व देवांना सुंदर गायनाने रमविले. पुढे एकदां ब्रह्मलोकांत मोठा उत्सव झाला. त्यावेळी सर्व देव तेथे आले होते. समेत गंधर्व व अप्सरांचे गायन चालले होते.

ततानद्धघनच्छिद्रवाद्यैः सह सुमन्जुलम् ॥
तत्र सर्वेषु गायत्सु ब्रह्मैवाग्रमना अभूत् ॥६२॥

ब्रह्माऽऽहैषां तु सर्वेषां कोऽयं गायति सुस्वरम् ॥
तदा त्वयेन्द्र स स्रष्टुः दर्शितो नेत्रसंज्ञया ॥६३॥

तदा निवारयामास कः सर्वान्हस्तसंज्ञया ॥
सस्त्रीकः स ततो गायन्नानारागं च सुस्वरम् ॥६४॥

श्रुत्वा गीतं तदानन्दं ज्ञात्वोवाच विधिस्तदा ॥
नादब्रह्मात्मतत्त्वं तत्सम्यक् प्राप्तमनेन हि ॥६५॥

विलक्षणोऽस्य चानन्दो रमयत्यपरानपि ॥
ब्रह्मलोकनिवासोऽस्य युक्तो भार्यान्वितस्य हि ॥६६॥

इत्युक्त्वा कृपया तस्मै यद्ब्रह्म श्रुत्यगोचरम् ॥
मुदा प्रदर्श्य सस्त्रीकं तं स्वाग्रेऽस्थापयद्विधिः ॥६७॥

एवं स कामशास्त्रज्ञो भोगान्भुक्त्वाऽखिलान्क्रमात् ॥
सस्त्रीकोऽगात्परानन्दं शास्त्रं शुद्धिकरं न किम् ॥६८॥

अर्थ : तेथें वीणादिक तंतुवाद्ये, मृदंगादि वाद्ये, घनवाद्ये, अन्य छिद्रवाद्ये यांच्या नादांत सर्वजण गात असतां ब्रह्मदेवाचे मन आनंदाने एकाग्र झालें. ब्रह्मदेव म्हणाले, "ह्या सर्वांत अत्यंत सुस्वरपणे कोण बरे गात आहे?" तेव्हां हे इंद्रा, तूं नेत्रसंकेतानें ब्रह्मदेवास गंधर्वराजा दाखविलास. तेव्हां ब्रह्मदेवानें हाताच्या खुणेनें इतर सर्वांना गाणें थांबविण्यास सांगितलें. तेव्हा गंधर्वराजा स्त्रीसह गात राहिला. त्याचें तें विविध रागांतील अत्यंत सुस्वर गायन ऐकून, व त्याचा गायनांतील आनंद जाणून ब्रह्मदेव म्हणाले नादब्रह्माचे जे आत्मभूत तत्त्व तें ह्या गंधर्वराजानें रागभेदानें प्राप्त करून घेतलेलें आहे. त्याचा आनंद लौकीक गायना पेक्षां विलक्षण वेगळा आहे. त्याचा अनुभव हा केवळ स्वतःच घेत नाही तर इतरांनासुद्धां तितक्याच उत्कटपणे प्राप्त करुन देतो. ह्याला स्त्रीसह ब्रम्हलोकीं वासच योग्य आहे. असे म्हणून ब्रम्हदेवानी श्रुत्यगोचर म्हणजे वाणीला अप्रकाशित ते ब्रम्ह आनंदानें त्यांस दाखविले. व त्याची ब्रम्हलोकांत स्वतःसमोर स्थापना केली. (राहण्याची व्यवस्था केली.) अशाप्रकारे कामशास्त्रज्ञ असा तो ब्राम्हण स्त्रीभोग भोगून क्रमाने स्त्रीसह परानन्दाप्रत पोचला. बृहस्पति इंद्रास म्हणाले शास्त्र हे शुद्धिकर नाही काय?"

॥ इति श्रीदत्तपुराणे तृतियाष्टके पञ्चमोऽध्यायः ३।५ ॥

॥ अथ विष्णुदत्तोद्धारो नाम तृतीयाष्टके षष्ठोऽध्यायः ॥

हरिःॐ ॥ एवं त्वान्यदप्युवे कश्चिद्वेदशर्मा द्विजोऽभवत् ॥
सुशीलस्तत्सुतो दैवात्सप्तब्रह्मग्रहैर्वृतः ॥१॥
दुर्धरान्दुरभिप्रायान्परस्परजयैषिणः ॥
सूपायैर्न शशाकैतान्समुद्धर्तुं शुशोच सः ॥२॥
ग्रहाविष्टोऽरुदन्मुह्यन्नृत्यन्धावन्हसन्रुषा ॥
नानाचेष्टा व्यधादेवं स्वार्थाद्भ्रष्टः स दैवतः ॥३॥

कदाचिद्वैश्वदेवान्ते तद्गृहे धूलिधूसरः ॥
भिक्षुको भस्मलिप्ताङ्गो मलिनो मक्षिकावृतः ॥४॥
दुर्गन्धः प्राप तेजस्वी तस्मै भिक्षां ददौ द्विजः ॥
छन्नात्मा कोयमित्युक्त्वा पृष्ठलग्नोऽभवद्द्विजः ॥५॥
भिक्षुस्तं ताडितमपि काष्ठलोष्टेष्टिकोपलैः ॥
पश्चाद्धावन्तमूचे किं कार्यं प्राप्तेन ते मया ॥६॥

अर्थ : ह्या अध्यायांत, पिशाचाच्या उपदेशाने ग्रहपीडेचे निवारण कसे झाले, आणि श्रीदत्तात्रेयांचे कृपेने विष्णुदत्ताचा उद्धार कसा झाला, ते सांगितले आहे. आतां तिसऱ्या गाथेचे विवरण बृहस्पति इंद्रास करतात—प्राचीनकाळीं वेदशर्मा नांवाचा एक ब्राह्मण होता. त्यास एक सुशील पुत्र होता, परंतु त्याच्या शरीरांत सात समंधांनी प्रवेश केला होता. ते समंध अत्यंत बलवान, कुबुद्ध व परस्परांबर जय मिळविण्यासाठी प्रयत्नशील असे होते. समंधपरिहार करून आपल्या पुत्राची पीडेपासून सुटका करण्याचा ब्राह्मणाने खूप प्रयत्न केला, अनेक चांगले उपाय केले, परंतु त्यांचा कांही उपयोग न झाल्याने तो शोक करूं लागला. समंधांच्या प्रभावाने त्याचा पुत्र क्षणांत रडत असें, धावत असे, नाचत असे, हसत असे, रागवत असे. अशा रीतीनें स्वकार्यभ्रष्ट असा तो मुलगा नाना चेष्टा करीत असे. दैवयोगानें एकदां असें झालें कीं, वैश्वदेव आटोपतांच वेदशर्म्याच्या घरीं एक धूलिधूसर, भस्मानें ज्याचें अंग माखलेले आहे असा मलिन, अंगावर माशा घोंगावत आहेत असा, दुर्गंधी, परंतु तेजस्वी असा भिक्षुक आला. वेदशर्म्यानें त्यास भिक्षा घातली, परंतु गूढस्वभावाचा हा भिक्षुक कोण असावा याबद्दल शंका येऊन त्यानें त्या भिक्षुचा पाठलाग सुरु केला. आपल्या पाठीमागून येणाऱ्या वेदशर्म्यास भिक्षुने लाकूड, दगड, विटा, जे जे सांपडेल त्यानें मारलें, परंतु वेदशर्म्यानें पाठलाग सोडला नाहीं. त्यावर भिक्षूनें त्यास विचारलें, "तुझें माझ्याकडे काय बरें काम आहे?"

इत्युक्तो दुःखितः पुत्रमुक्त्यै तं प्रार्थयद्द्विजः ॥
प्रादुर्भूयात्मना दत्तो दत्त्वा सममनूजगौ ॥७॥

एकैकेनैषामेकैकं क्रमाद्ग्रहमपाकुरु ।
यथा ज्ञानावृतीः शास्त्रैः क्रमादुन्मूलयन्त्यमूः ॥८॥
न ह्यन्योन्यविरुद्धास्ते जय्या एकेन दुर्ग्रहाः ।
तथैभिस्ताञ्जहीत्युक्त्वा देवोऽदृश्योऽभवत्क्षणात् ॥९॥
ततस्तुष्टः स धामैत्य यथा दत्तोदितं व्यधात् ।
एकैकमन्त्रेणैकैकमेकैकेन दिनेन सः ॥१०॥
मन्त्रशास्त्रविधानेन क्रमाद्ग्रहमपाकरोत् ॥
शोकाद्येकैकवारेण नष्टमेकैकनिर्गमे ॥११॥
पूर्ववत्सोऽष्टमेह्न्यासीत्ततोऽभ्यासाद्ययौ गतिम् ॥
शास्त्रं क्षुद्रमपीदं तु मोक्षोपकृतये न किम् ॥१२॥

अर्थ : भिक्षूचा तो प्रश्न ऐकून दु:खित अशा त्या ब्राह्मणाने आपल्या पुत्राची समंधबाधेपासून सुटका होण्याबद्दल प्रार्थना केली. त्यावेळी भिक्षूनें आपले श्रीदत्तात्रेयस्वरूप प्रकट केले आणि पिशाचविमोचनासाठीं सात मंत्र सांगितले. आणि पुढे म्हणालें, "यापैकीं एकेक मन्त्रानें एकेक ग्रहाचें निवारण कर. शास्त्रांच्या योगे ज्याप्रमाणे ज्ञानावृत्तीचें निवारण होते त्याप्रमाणे क्रमाक्रमाने ह्या ग्रहांचे निवारण कर. हे समंध एकमेकांचे विरुद्ध असल्यानें एकाच मंत्राने ते निवारण करणें व त्यांच्यावर जय मिळविणें कठीण आहे. म्हणून ह्या मंत्रांनी क्रमवार त्यांच्यावर जय मिळव." असें म्हणून भगवान् श्रीदत्तात्रेय क्षणांत अदृश्य झाले. त्यानंतर वेदशर्मा घरीं आला व श्रीदत्तात्रेयांनी सांगितल्यानुसार करतां झाला. एकेक मंत्राचे योगाने एकेक दिवशी एकेक ग्रहाचे निवारण त्याने शास्त्रशुद्ध पद्धतीने केले. त्यामुळे त्याच्या पुत्राचा शोक, रुदन, आदि सर्व पीडा नाहींशा झाल्या व आठव्या दिवशी तो पीडापासून पूर्ण मुक्त झाला. नंतर वेदाभ्यासादि करून तो मोक्ष पावला. तेव्हां मंत्रशास्त्र क्षुद्र असले तरी त्याचा मोक्षासाठी उपयोग झाला नाही काय ?

मातापुरे विष्णुदत्तशर्मा पत्न्या सुशीलया ॥
न्यवसद्गृहिधर्मेण दत्तभक्तो महामतिः ॥१३॥

तद्द्वार्यश्वत्थवृक्षेऽभूद्ब्रह्मरक्षो दिने दिने ॥
विप्रत्यक्तं भूतबलिं बुभुजेऽपीडयन्न तौ ॥१४॥
तेनान्ये पीडिता लोकाःशान्तो विप्रान्नसेवनात् ॥
कदाचिद्वैश्वदेवान्ते प्रादुरास स्वरुपतः ॥१५॥
दृष्ट्वात्मानं करालं स भीतं ज्ञात्वाऽऽह मञ्जुवाक् ॥
विप्र मा भीर्वृणीष्वेष्टं राक्षसोऽहं त्वदन्नभुक् ॥१६॥
स्वपत्न्याभिमतेनाह श्रीदत्तं दर्शयापरम् ॥
न काङ्क्षेऽत्र परत्रापीत्युक्तः प्राह स राक्षसः ॥१७॥
तदाख्यापि न मे श्राव्या तथापि कथयामि ते ॥
तुष्टोऽस्मि प्रतिकर्तुं ते प्रयत्नाद्दर्शयाम्यतः ॥१८॥

अर्थ : यानंतर बृहस्पति चौथी गाथा सांगतात– मातापुरांत विष्णुदत्त नांवाचा ब्राह्मण, मोठा दत्तभक्त व महाबुद्धिमान् असा, आपल्या सुशील पत्नीसह गृहस्थधर्मानें रहात होता. त्याच्या दारांतील अश्वत्थवृक्षावर एक मोठा ब्रह्मराक्षस राहिला होता. विष्णुदत्तानें रोज दान केलेला भूतबलि (काकबलि) तो प्रत्यहि भक्षण करीत असे. त्यानें त्या दांपत्याला कधीही पीडा केली नाहीं. त्यानें अन्य अनेक लोकांना पीडा दिल्या, परंतु विष्णुदत्तानें दिलेल्या अन्नानें तो उत्तरोत्तर शांत होत गेला. एकदां विष्णुदत्त वैश्वदेव करून बलि घेऊन बाहेर आला असतां ब्रह्मराक्षस आपल्या भयंकर स्वरूपांत त्याचे समोर प्रकट झाला. विष्णुदत्तास त्या झाडावर ब्रह्मराक्षस असण्याची कांहीही कल्पना नसल्यानें तो ते भयंकर स्वरूप पाहून घाबरला. आपल्या भयंकर स्वरूपाच्या दर्शनानें तो भ्यालेला आहे हे जाणून ब्रह्मराक्षस गोड वाणीनें विष्णुदत्तास म्हणाला, "हे ब्राह्मणा, भिऊ नकोस. तूं रोज दिलेलें बलिअन्न खाणारा मी राक्षस आहे. तुला अभीष्ट असेल ते मागून घे. मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे." राक्षसाचे ते भाषण ऐकून भीति शांत झालेल्या विष्णुदत्ताने आपल्या पत्नीचा विचार घेतला. व राक्षसास म्हणाला, "मला श्रीदत्तात्रेयांचे दर्शन घडव. याशिवाय मला इह किंवा परत्र कांहीही इच्छा नाही." हे

ऐकून राक्षस म्हणाला, " मी पीडा देणारा ब्रह्मराक्षस असल्यानें श्रीदत्तात्रेयांचें नांवसुद्धां ऐकण्यास योग्य नाही. तसेंच मी अत्यंत पापीही आहे. तेव्हां त्यांचे दर्शन घडवून आणण्याची गोष्टच दूर. तथापि, पिशाचांना भूत, वर्तमानकाळाचे ज्ञान असते. त्याचा फायदा घेऊन मी तुला श्रीदत्तात्रेय जेथें ज्या रूपांत दिसतील त्याची ताबडतोब माहिती देईन. तूं अन्नदानानें माझ्यावर फार उपकार केले आहेस, त्याची अंशतः परतफेड करण्याचा मी अशारितीनें खूप प्रयत्न करीन.

विश्वात्मा दुर्धरो दैवैरपि तं भक्तिगम्यमित् ॥
आत्मानं चेत्क्षमं ज्ञातुं कृतकृत्यो भविष्यसि ॥१९॥
एकदोन्मत्तवच्छ्रीशं ज्ञात्वा मद्यापणस्थितम् ॥
आहूयाह द्विजं रक्षो विद्धि तं योगिदैवतम् ॥२०॥
विप्रस्त्ववेक्ष्य तं हीनं मेनेऽदृश्योऽभवत्तदा ॥
खिन्नोऽगाध्दाम तं रक्षः प्राह दुर्भाग्य किं कृतम् ॥२१॥
शासितोऽपि पुरा विप्र मोहितोऽसि कथं वद ॥
संदेक्ष्ये पुनरप्येनं सावधान इतो भव ॥२२॥
अथैकदाऽऽह रक्षोऽङ्ग श्ववृतो धूलिधूसरः ॥
तमात्मक्रीडमात्मानं विध्यात्मरतिमुत्तमम् ॥२३॥
रक्षोभिरपि यः स्मर्तुमशक्योऽहं तु दैवतः ॥
रक्षोऽभवं विप्रकोपात्तद्भक्तोऽपि ततः स्मरे ॥२४॥
विप्रोऽप्यथास्थिभूषं तं रक्ताक्षं संमुखोऽगमत् ॥
तेनास्था ताडितोऽधावत्स भीतो जीवितेच्छया ॥२५॥
रक्षोऽवदत्परं दैवं मन्ये यत्नो निरर्थकः ॥
मिथ्याऽऽत्मताडनात्का ते हानिर्विप्र विचारय ॥२६॥

अर्थ : (राक्षस पुढें सांगू लागला.) विश्वात्मा, असा श्रीदत्तात्रेय देवांनासुद्धां दुष्प्राप्य आहे. परंतु भक्तिमान् माणसाला सुलभ आहे. त्या परमात्म्यास तूं जर जाणूं शकतील तर कृतकृत्य होशील. तुझा व माझा लोभ

संबंध जडला असल्याने तुला श्रीदत्तात्रेयांचे दर्शनाचा लाभ झाला असता मलाहि धन्यता लाभेल. " त्यानंतर एकदां राक्षसानें श्रीदत्तात्रेयांना मद्याच्या दुकानांत उन्मत्तपणे उभे राहिलेले पाहिले. त्याबरोबर ब्राह्मणास बोलावून तो म्हणाला, " अरे योग्यांचें दैवत असलेल्या त्यास पहा, पहा. ब्राह्मणाने त्यांस पाहिले परंतु कोणीतरी हीन, पापी, मलीन, मनुष्य जाणून दुर्लक्ष केले. त्याबरोबर श्रीदत्तात्रेय अदृश्य झाले. तेव्हां ब्राह्मण अतिशय खिन्न होऊन आपल्या घरी गेला. त्यावर राक्षस त्यास म्हणाला, " अरे अभाग्या हे तू काय केलेस ? तुला मी सूचना पूर्वीच दिली असूनही तुला हा भ्रम कसा झाला ? तें सांग. मी आतां पुनः ह्याचें (श्रीदत्तात्रेयांचे) दर्शन तुला घडवीन, परंतु आतापासूनच सावधपणा ठेव व संधी चुकवूं नकोस. त्यानंतर एकदां राक्षस ब्राह्मणास म्हणाला, " हे ब्राह्मणा, श्वानांनी वेढलेला, धुळीनें सर्वांग भरलेला स्वतःमध्येच रमणारा व स्वतःशीच खेळणारा, परमात्मा व अत्यंत श्रेष्ठ असा तो तेथें बसलेला आहे. त्यास तूं परमेश्वर म्हणून ओळख व त्याचे पाय धर. त्याचे स्मरणसुद्धां राक्षसांस अशक्य आहे. परंतु मी दैववशात् ब्राह्मणाच्या कोपामुळे राक्षस झालो. मी त्याचा (श्रीदत्ताचा) पूर्वजन्मीं भक्त होतो म्हणून मला हें सर्व स्मरतें आहे. " हें भाषण ऐकून ब्राह्मण अस्थि धारण केलेल्या तांबडेलाल डोळे असणाऱ्या श्रीदत्तात्रेयांच्या समोर गेला, परंतु श्रीदत्तात्रेयांनी त्यास अस्थींनीं प्रहार केल्यामुळें जीविताच्या भीतीनें पळून गेला. तें पाहून राक्षस म्हणाला, " हें विप्रा, शेवटीं दैव हें बलवत्तर असून प्रयत्न विफल असतात असें मला वटतें कारण, विकारित्व, जडत्व, दृश्यत्व, यामुळें मिथ्यात्मा असलेला जो देह, त्याला अस्थींनीं ताडन केले असतां तुझी काय हानी झाली असती त्याचा विचार कर. श्रीदत्तात्रेयांच्या दर्शनाचा व कृपेचा लाभ तुझ्या दैवांतच नाहीं हे खरें.

भूयोऽपि दर्शयिष्ये ते कार्यं साधय यत्नतः ॥
किं कार्यमिति पृच्छेचेत्प्रसन्नः स तदा वद ॥२७॥
दर्शश्राद्धे क्षणं दास्ये प्रसादः क्रियतामिति ॥
अथैकदाऽऽह रक्षो यः श्वभ्यो मृतखरामिषम् ॥२८॥

दत्त उत्कृत्य तं विद्धि देवं सत्यं वचो मम ॥
पत्न्यापि शिक्षितो धैर्याद्गत्वा तच्चरणेऽग्रहीत् ॥२९॥
मांसास्थिताडितोऽप्युक्तो मुञ्च मुञ्च व्रजेत्यपि ॥
धैर्यात्स्वार्थपरो विप्रो ववन्दे न मुमोच तम् ॥३०॥
दीनमार्तं द्विजं धीरं ज्ञात्वाऽऽह कृपया प्रभुः ॥
आगतोऽसि त्रिवारं किं कार्यं व्रात्येन ते मया ॥३१॥
श्राद्धे निमन्त्रयामीति द्विजेनोक्तोऽवदद्धत ॥
पितरोऽधः पतिष्यंति श्राद्धेऽनाचारयोजनात् ॥३२॥

अर्थ : (यानंतर राक्षस विष्णुदत्त ब्राह्मणास पुढें म्हणाला) असो, झाले तें झालें. मी तुला पुन्हा त्यांचे दर्शन घडवितो. त्यावेळीं मात्र प्रयत्नपूर्वक स्वतःचें कार्य साधून घे. त्यावेळी ते (श्रीदत्त) प्रसन्न होऊन, "तुझे काय कार्य मी करूं?" असे विचारतील तेव्हां अशी प्रार्थना कर की, "मी आपल्यास दर्शश्राद्धाचें आमंत्रण देईन तें स्वीकारून कृपा करा." नंतर एकदां राक्षस ब्राह्मणास म्हणाला, "अरे ब्राह्मणा, हे पहा हा जो स्वतःच्या भोवतालच्या श्वानांना मेलेल्या गाढवाचें मांस तोडून खाण्यास देत आहे तोच देव (श्रीदत्तात्रेय) आहे. हें माझे सांगणे खरें मान." विष्णुदत्तास ह्या वेळीं त्याच्या पत्नीनेंही सूचना दिली होती. त्यामुळें धैर्यानें तो श्रीदत्तांकडे गेला व त्यांचे दोन्ही चरण घट्ट धरून राहिला. श्रीदत्तात्रेयांनी त्यास मांस व अस्थींनी खूप मारलें, "मला सोड सोड, निघून जा" असें बजावलें, परंतु स्वतःचें परम कल्याण साधून घेण्याची इच्छा असणाऱ्या त्या ब्राह्मणानें त्यांचे पाय न सोडतां वंदन केलें. तेव्हां दीन, आर्त अशा विष्णुदत्तास चीट जागून श्रीदत्तात्रेय कृपेनें त्यास म्हणाले, "हे विष्णुदत्ता, तूं माझ्याकडे तीन वेळा आला आहेस. माझ्यासारख्या अपवित्र व संस्कारहीनाकडून तुझें कोणते कार्य व्हावें असे तुला वाटते?" त्यावर विष्णुदत्तानें उत्तर दिलें, "मी आपल्याला श्राद्धाचे निमंत्रण देत आहे. तरी त्याचा आपण स्वीकार करून माझ्या घरी यावें." या वचनावर श्रीदत्तात्रेय म्हणाले, "अरे ब्राह्मणा, माझ्यासारख्या अनाचारी माणसास तूं श्राद्धास आमंत्रित केलेस तर तुझे सर्व पितर अधोगतीस जातील."

द्विजोऽब्रवीत्किमाचारैर्लभ्यन्तेऽन्यैश्च का क्षतिः ॥
तवेशस्याप्तकामस्य किमसक्तस्य कर्मभिः ॥३३॥
इत्युक्त ओं तथेत्युक्त्वा स्वरूपेण स्थितोऽवदत् ॥
निमन्त्र्यान्यं च मत्कल्पं पाकशुद्धिर्विधीयताम् ॥३४॥
सुस्नातः शुचिरेष्यामि त्वद्गेहम कुतुपक्षणे ॥
न श्मशानं न मांसास्थि तत्रापश्यद्द्विजस्तदा ॥३५॥
श्मशानं योगभूः श्वानो वेदाः शास्त्राणि वायसाः ॥
दृष्टो द्विजेनावधूतः साक्षाद्दत्तस्त्रिरूपधृक् ॥३६॥
द्विजो नत्वाऽऽह धन्योऽस्मि धन्यौ मे पितरौ कुलम् ॥
यत्पुण्यौघादपि कुधीरद्राक्षं ते पदं महत् ॥३७॥
इत्युक्त्वा स द्रुतं गेहं गत्वा पत्न्यै शशंस तत् ॥
सापि हृष्टा सती पाकं विधिना कर्तुमारभत् ॥३८॥

अर्थ : श्रीदत्तात्रेयांचें भाषण ऐकून ब्राह्मण म्हणाला, "केवळ आचार-पालन करून काय मिळते? आणि अनाचारानें वागूनच कोणता तोटा होतो? नित्य तृप्त व अनासक्त अशा आपणांस कर्माशी काय बरें करावयाचें आहे?" ब्राह्मणाचे हे भाषण ऐकून श्रीदत्तात्रेय "ठीक आहे" असे म्हणाले व त्याचे पुढे स्वतःच्या खऱ्या स्वरूपांत प्रकट होऊन म्हणालें, "माझ्यासारख्याच दुसऱ्या पंक्तियोग्य ब्राह्मणास निमंत्रण दे, आणि पाकशुद्धि करव. तोपर्यंत मी सुस्नात होऊन शुद्ध होवून तुझ्या घरीं दिवसाच्या अष्टमांशी म्हणजे अपराह्ण-काळीं येतो." विष्णुदत्तानें श्रीदत्तात्रेयांकडे पुन्हां पाहिलें तर स्मशान, मांस, अस्थि, वगैरे सर्व अदृश्य होऊन स्मशानाचे जागी योगभूमि, श्वानाचे ठिकाणी वेद, कावळ्यांचे ठिकाणी षट्शास्त्रें दिसली. आणि अवधूतांचें ठिकाणी त्रिमूर्ति श्रीदत्तात्रेय दिसू लागला. तें पाहून ब्राह्मणास अत्यंत आनंद झाला. तो नमस्कार करून म्हणाला, "मी खरोखर धन्य असून माझे पितर व कुलही धन्य झाले आहे. अल्पमति असा मी केवळ पितरांच्या पुण्यप्रभावामुळें आपलें महापवित्र

चरण मला दिसत आहेत." असें म्हणून त्या ब्राह्मणानें त्वरीत घरी जावून आपल्या पत्नीस सर्व हकिगत सांगितली. ती ऐकून ती सती फार आनंदित झाली. तिनें तात्काल विधिवत् स्वयंपाक करण्यास आरंभ केला.

क मृग्योऽन्यो द्विजस्तुल्यः इत्युक्तो राक्षसोऽब्रवीत् ॥
यत्रायातीश्वरस्तत्र समायान्त्यखिलाः सुराः ॥३९॥
तथाप्यर्कं गृहपतिं वह्निं वाऽत्र निमन्त्रय ॥
कार्यं ते साधितं सर्वं प्रसादे मां न विस्मर ॥४०॥
तथेत्युक्त्वा स पत्न्यै तच्छशंसात्रान्तरेऽत्रिजः ॥
श्रीश एत्याह मत्कल्पः कोऽन्यो विप्रो वद द्विज ॥४१॥
स्वासनेऽत्रास्यतामन्यो विप्र आयास्यतीति तम् ॥
उक्त्वा सती बहिर्गत्वाऽऽजुहावार्कं प्रणम्य सा ॥४२॥
सर्वात्मन्वीर सवितः करोषि त्वं सचेतनम् ॥
विश्वं जडमपीहाद्य देवागच्छ दयस्व नः ॥४३॥
इत्यर्कः प्रार्थितो विप्ररूपी प्रापात्रिजोऽवदत् ॥
देवहीनं कथं श्राद्धं तृतीयोऽन्विष्यतां तथा ॥४४॥

अर्थ : आतां श्राद्धाकरतां दुसरा योग्य ब्राह्मण कोण आणावा याचा विचार ब्राह्मण करूं लागला. त्यानें राक्षसास विचारतां राक्षस म्हणाला, "ज्याठिकाणीं प्रत्यक्ष ईश्वरच येतो तेथे सर्व देवही येतात. तथापि, निमंत्रण करावयाचे तर सूर्यास किंवा गृहपति जो अग्नि, त्यास कर. आणि हें पहा, मी तुझें कार्य साधून दिलें आहे. तेव्हां मला विसरूं नकोस. आठवणीनें मला प्रसाद दे." ब्राह्मणानें "ठीक आहे" असें म्हणून पत्नीस सर्व वृत्तांत कथन केला. थोड्याच वेळात श्रीदत्तात्रेय विप्रगृहीं आले व म्हणाले, "हे ब्राह्मणा, माझ्यासारखा दुसरा ब्राह्मण कोण बोलाविला आहेस तें सांग." त्यावर ब्राह्मणपत्नीनें उत्तर दिलें, "आपण कृपा करून स्वासनावर बसावें. दुसरा विप्र येईलच." असें म्हणून ब्राह्मणपत्नी बाहेर गेली व सूर्यास नमस्कार करुन त्यांस आमंत्रण दिलें. ती म्हणाली, "हें सर्वात्मन्, सूर्य देवा, हें जड विश्व तूं स्वतःच्या तेजाचे योगें सचेतन करतोस. आमच्यावर कृपा कर व आमंत्रणाचा स्वीकार करून सत्वर ये." याप्रमाणें प्रार्थना ऐकून सूर्यदेव ब्राह्मणाचें रूप घेऊन आला. त्यावर श्रीदत्तात्रेय म्हणाले, "देवाच्या उपस्थितीशिवाय श्राद्ध कसे होईल. तरी तिसरा ब्राह्मण बोलवून आणावा."

सती गृहपतिं प्राह कर्माध्यक्षांशतोऽधुना ।
एहीत्युक्तोऽग्निरप्याप तत्कल्पो विश्वरूपधृक् ॥४५॥
दैवेऽग्निमुपवेश्येशं पित्र्येऽर्कं च यथाविधि ।
व्यधाच्छ्राद्धं मुदा भुक्तास्तृप्ताः स्मेत्यवदंस्त्रयः ॥४६॥
आचान्तेष्वक्षयं दत्वा तमष्टशतनामभिः ॥
नत्वाऽऽह राक्षसोक्त्या वः कृतकृत्योऽस्मि दर्शनात् ॥४७॥
दत्तःप्राहैतु रक्षोऽपि मदुच्छिष्टाशनाद्गतिम् ॥
मुक्तास्ते पितरः पत्न्या सिद्धस्त्वं चैहि सद्गतिम् ॥४८॥
दत्वा विद्या ययौ दत्तः स्वर्यानं कामगं च कः ॥
उभयर्धीश्च शुष्मैवं तेजीयान्सोमवत्कृती ॥४९॥
अलङ्घ्यशासनो ऽ भीष्टभागभूच्छास्त्रदृग्द्विजः ॥
रक्षोप्युच्छिष्टभुङ्मुक्त एवं शास्त्रक्रमाद्गतिः ॥५०॥

अर्थ : श्रीदत्तात्रेयांचे हें वचन ऐकून ती ब्राह्मण पत्नी अग्निनारायणास प्रार्थना करून म्हणाली, "हे कर्माध्यक्षा, तुम्ही अंशरूपानें आता येऊन आसनावर बसावें." त्यावर अग्निदेव ब्राह्मणाचे रूपानें आले व आसनावर बसले. देवस्थानी अग्नि आणि पितृस्थानी श्रीदत्तात्रेय व सूर्य यांस बसवून ब्राह्मणानें श्राद्ध केलें. भोजन झाल्यावर, "आम्ही तृप्त झालो आहोत" असे तिघेही म्हणाले. पिण्डदानानंतर आचमन करून एकशेआठ नामांचा उच्चार करून, साष्टांग नमस्कार करून ब्राह्मण तिघांना म्हणाला, "राक्षसाने मार्गदर्शन केल्याप्रमाणें आपले दर्शन पावून मी कृतकृत्य झालो आहे." त्यावर श्रीदत्त म्हणाले, "माझें उच्छिष्ट भोजन केल्यामुळें राक्षसही उत्तम गतीस जावो, मुक्त होवो. तुझे पितरही मुक्त झाले आहेत. तूं सुद्धां सिद्धी प्राप्त

करून घेऊन पत्नीसह उत्तम गतीस जाशील." असे म्हणून श्रीदत्तात्रेयांनी ब्राह्मणास सर्व मंत्र दिले व ते अंतर्धान पावले. सूर्याने त्या दंपतीस यथेष्ट गमन करणारे विमान दिले. अग्नीने ऐहिक व पारलौकिक सिद्धी दिल्या. याप्रमाणे तो विष्णुशर्मा ब्राह्मण अत्यंत तेजस्वी व कृतकृत्य झाला. तो अलंघ्य-शासन, अभिष्ट प्राप्ति करून घेणारा व शास्त्रवेत्ता झाला. राक्षसही उच्छिष्ट-भक्षणाने मुक्त झाला. याप्रमाणे शास्त्रामुळे क्रमशः गति मिळते हे दिसून येते.

॥ इति श्रीदत्तपुराणे विष्णुदत्तोद्धारोनाम तृतीयाष्टके षष्ठोध्यायः ॥

॥ अथ रोग्युद्धारादिकथनं नाम तृतीयाष्टके सप्तमोऽध्यायः ॥ ३ । ७ ॥

हरि ॐ ॥ प्रभुप्रसादाद्विप्रोऽयं कमप्यन्वग्रहीत्स च ॥
कृतार्थो भवतीत्येवं प्रसिध्दोऽभूत्स भूतले ॥१॥
गोदावासी द्विजः कश्चिध्दरिशर्मा तदात्मजः ॥
द्विदशाब्दो यस्य जन्या गुल्मोऽष्टाब्दः क्षयोऽभवत् ॥२॥
त्र्यब्दो जलोदरो जीर्णज्वर एकाब्द आयनः ॥
अतिसारः सकासश्च चातुर्मास्यो भगन्दरः ॥३॥
त्रिदोषेणापि संक्रान्तं प्रेक्ष्य मृत्युन्मुखं पतिम् ॥
तद्भार्या षोडशाब्दागाच्छरणं विष्णुदत्तमित् ॥४॥
सौभाग्यं देहि मे ब्रह्मन्भर्ता मे रोगपीडितः ॥
अत्युत्कटाः प्रतीकारा दैवाज्जाता निरर्थकाः ॥५॥
इत्यर्थितो दयालुः स साध्व्या तद्गृहमेत्य तम् ॥
दृष्ट्वा कर्मविपाकोक्तं पत्न्या व्रतमकारयत् ॥ ॥६॥

अर्थ : या अध्यायांत एका रोगपीडित विप्राचा उद्धार झाला आणि एका झोटिंग पिशाचाचा निग्रह बंदोबस्त केला अशा प्रकारचें वर्णन केलें आहे. त्याचप्रमाणे श्रुतिवचनें हीं रोचनार्थ गोडी लागून प्रवृत्ती निर्माण करण्यासाठीच असतात. असें वर्णन आणि प्राणीमात्राचा जन्मक्रम कसा कसा असतो याचे

वर्णन या अध्यायांत आले आहे. यानंतर कथा (५) प्रस्तावना करतात. श्रीदत्तगुरूंनी ज्यांचेवर कृपा करुन उद्धार केला, तो विष्णुदत्तशर्मा विप्र, त्याचें वर्णन पूर्वाध्यात आलेले आहेच. श्रीदत्तकृपेनें तो ब्राम्हण ज्यांचेवर कृपानुग्रह करील, त्याचा उद्धार होऊन तो कृतार्थ होतो अशा प्रकारची प्रसिद्धी भूतलावर झालेली होती. गोदातीरवासी कोणी एक ब्राम्हण होता त्याचा वीस वर्षांचा हरिशर्मा नामक एक मुलगा होता. जन्मतःच त्याला गुल्मरोग झालेला होता. वयाच्या तेराव्या वर्षी त्यास आठ वर्षे कायमचा क्षय झालेला होता. शिवाय पुन्हां आठव्या वर्षीच तीन वर्षाचा जलोदरही झाला होता. आणि त्याच प्रमाणे एक वर्षाचा जीर्णज्वरही झालेला होता. त्याचप्रमाणे अतिसार, श्वास, दमा, भगंदर इत्यादि रोगहि त्यांस झालेले होते. त्रिदोषानें व्याप्त होऊन तो मुलगा मरणोन्मुख झालेला होता. तात्पर्य सर्व रोगांचे तो माहेरघरच बनलेला होता. त्याची सोळा वर्षाची पत्नी श्रीविष्णुदत्तांस शरण जाऊन त्यांना म्हणाली, अहो श्रीविष्णुदत्ता, माझा पति मृत्युच्या दारांत आहे. त्याला आता कोणीही वाचवू शकणार नाही. तुम्हीच आता माझ्यावर कृपा करून मला सौभाग्यदान द्या. माझा पति सर्व रोगांनी व्यापलेला असून रोगांचा प्रतिकार व्हावा या हेतूने आतापर्यंत अतिशय जालीम उपायही केलेले आहेत. परंतु दैवयोगाने ते सर्व उपाय निरर्थकच झालेले आहेत. याप्रमाणे विप्रकुमाराच्या साध्वीने प्रार्थना केल्यावर दयाळु असे विष्णुदत्त त्या विप्राच्या घरी गेले व त्याला पाहुन कर्मविपाक शास्त्रात सांगितल्याप्रमाणे त्याच्या पत्नीकडून प्रायश्चित्त कर्मे यथासांग करवुन घेते झाले. प्रायश्चित्ताने रोगशमन होते असे म्हटले आहे.

क्रमेणाशु लयं प्राप तत्तद्रोगः प्रतिव्रतम् ॥
क्षय ब्रह्मवधोत्थेऽदाद्द्वादशाब्दं स निर्गतः ॥७॥
गुल्म षडब्देन देवद्रोहोत्थोऽपि जलोदरः ॥
द्वादशाह्नेन चाब्देन पापोत्थोऽपि भगन्दरः ॥८॥
ज्वरोऽब्देनातिसारश्च त्रिदोषश्चौषधाद्गतः ॥
द्विजोऽथ तं हृदि स्पृष्ट्वा जजापोपनिषन्मतुम ॥९॥

नीरुग्लेभे द्विजस्तेन भूतिमायुः प्रजां यशः ॥
दिव्यां गतिं दत्तभक्तिमिहामुत्र च सद्गतिम् ॥१०॥
पितृत्वेन वृतः सत्या द्विजः प्रस्थापितो ऽस्पृहः ॥
ययौ धामेति रुग्णोऽपि द्विजोऽगात्सद्गतिं ततः ॥११॥
क्रमाद्रोगेषु नष्टेषु यथान्ते पुष्टिदो रसः ॥
नष्टेष्वविद्यादोषेषु शास्त्रैर्बोधस्ततो रसः ॥१२॥

अर्थ : विष्णुदत्ताने जसजसे एकएक प्रायश्चित्त त्या ब्राह्मणपत्नीकडून करवून घेतले तसातसा एकएक रोगाचा क्रमाने परिहार झाला. ब्रह्मवधामुळे निर्माण झालेल्या क्षयरोगासाठी ३६ प्रायश्चित्ते करविली तेव्हां बारा वर्षांचा तो क्षयरोग नाहींसा झाला. गुल्मरोग सहा वर्षांनी व देवद्रोहामुळे होणारा जलोदर बारा वर्षांनी नाहींसा झाला. तसेच पापाचरणाने होणारा भगन्दर हा रोग एक वर्षाच्या प्रायश्चित्ताने नष्ट झाला. ज्वर एक वर्षाने व अतिसारही एक वर्षाने नाहीसा झाला. कफवातपित्ताचा त्रिदोष औषधाने गेला. त्यानंतर विष्णुदत्ताने ब्राह्मणकुमाराच्या हृदयास स्पर्श करून उपनिषद् मंत्राचा जप केला. त्यामुळे त्याला आरोग्य, ऐश्वर्य आयुष्य, संतति, यश, उत्तम गती, दत्तभक्ति यांचा लाभ होऊन शेवटी सद्गति मिळाली. त्याच्या पत्नीने विष्णुदत्ताला आपला पिता मानले. असा तो निःस्पृह विष्णुदत्त ब्राह्मण स्वगृहीं निघून गेला, व रोगी अशा त्या द्विजपुत्रासही सद्गति मिळाली. क्रमाक्रमाने रोगांचा नाश केल्यानंतर पुष्टिदायक रसायन देतात, त्याप्रमाणे प्रथम अविद्यारूपी दोषांचा नाश शास्त्रांच्या योगाने करून नंतर बोध केल्याने परमानन्दाची प्राप्ति होते".

मिथ्याशनोत्थरोगार्तं ब्राह्मणी काचिदात्मजम् ॥
अम्बा निम्बं पिबेत्याह तिक्तं नादूरदृक् पपौ ॥१३॥
दास्ये लड्डुकमित्युक्तः पपौ दत्वापि तत्करे ॥
अपथ्यशङ्किनी युक्त्या ततो जग्राह लड्डुकम् ॥१४॥
फलं लड्डुकवद्गौणं मुख्यमारोग्यवत्परम् ॥
रोग्यर्भवद्भवाध्यार्तो हितकृन्मातृवच्छ्रुतम् ॥१५॥

स्वर्गार्थं कामभोगार्थं शत्रुघातार्थमप्ययम् ॥
न वशीकरणार्थं च शास्त्रौघो बुद्धिशुद्धिदः ॥१६॥

अर्थ : यानंतर श्रीदत्तात्रेय कार्तवीर्य राजास म्हणाले, "एका ब्राह्मणीच्या पुत्रास गोड खाण्यामुळें रोग झाला. तेव्हां तिने त्यास कडुलिंबाचा रस पिण्यास दिला. परंतु दूरदृष्टी नसल्यानें मुलगा तो प्राशन करीना. तेव्हां तिनें "औषध पी म्हणजे लाडू देते," असे सांगून त्याचे हातांत लाडू ठेवला. त्याबरोबर त्याने कडुनिंबाचा रस पिऊन टाकला. तेव्हां लाडू खाण्याने अपथ्य होईल हे जाणून आईनें युक्तिप्रयुक्तीनें मुलाच्या हातून लाडू काढून घेतला. तद्वत्च, फल हें लाडवासारखे गौण असून सर्वोत्कृष्ट मोक्षपद हे आरोग्याप्रमाणें महत्वाचे आहे. भवरूपी व्याधींनी त्रस्त असा मनुष्य रोगी मुलांप्रमाणे असून, श्रुतिउपदेश हा वरील गोष्टींतील हितैषि मातेप्रमाणें आहे. शास्त्रें ही स्वर्गप्राप्तीसाठीं, कामभोगार्थ, शत्रुचा नाश करण्यासाठी किंवा वशीकरणासाठीं उपयोगांत आणावयाची नसून बुद्धिशुद्धिसाठीं त्यांचा उपयोग आहे.

विप्रस्य कस्यचिद्भार्यां दृष्ट्वा तन्वीं गते प्रिये
ग्रामान्तरे तत्स्वरूपधृक् झुटिंगो ह्यवाप ताम् ॥१७॥
कामार्तो वर्ण्यवस्थायां दुराचारो हि यो मृतः ॥
स झुटिंगत्वमेत्यैव दुर्धरः कामलम्पटः ॥१८॥
कथं ह्याश्वागम इति सत्योक्तः सत्कृतोऽवदत् ॥
गतो यदर्थं मार्गे स मिलितः प्राह नाधुना ॥१९॥
साध्यं कार्यं मासमात्रादेहीत्युक्तोऽञ्जसागमम् ॥
इति तां वञ्चयित्वा स साध्वीं स्ववशमानयत् ॥२०॥
वशं गता तस्य मायामजानन्ती मनस्विनी ॥
धार्ष्ट्यं बलं भोगशक्तिं विकारांश्च विलक्षणान् ॥२१॥
ज्ञात्वापि दुःखिता वक्तुं न शशाकाप्रियं क्वचित् ॥
तस्मिन्संदिग्धचित्तापि प्रत्याख्यातुमनीश्वरा ॥२२॥

अर्थ : त्यानंतर श्रीदत्तात्रेय सांगतात, "एक झोटींग पिशाच होते. एका ब्राह्मणाची एक स्वरूप सुंदर पत्नी होती. एकदां तो ब्राह्मण कामानिमित्त परगांवी गेला असतां त्या सुंदर स्त्रीला पाहून झोटिंगानें त्या ब्राह्मणाचे रूप घेऊन तिचेसमोर जाऊन उभा राहिला. कामार्त होऊन जो पुरुष ब्रह्मचारी, अवस्थेंत मृत्यु पावतो तो झोटिंग होतो. त्याची कामवासना दुर्धर असते. पतीला सत्वर परत आलेलें पाहून विप्रपत्नी म्हणाली "आपण तात्काल कसें परत आलात?" त्यावर त्या पतिरूप झोटिंगाने उत्तर दिले, "ज्याचेसाठीं मी गेलो होतो तो वाटेतच भेटला व त्यानें सांगितले की काम आता होणार नाहीं. आणखी एक महिन्याने यावें. त्यामुळे मीं जलदीने परत आलो आहे" असे बोलून त्या झोटिंगानें फसवून त्या साध्वी स्त्रीला वश करून घेतले. त्याला वश झालेली ती सत्शील स्त्री, त्याचे कपट न जाणून, त्याची धार्ष्ट्याची वर्तणूक, बल, भोगशक्ती, विलक्षण विकार हे जाणून दुःखित होऊनही कोठेही ती अप्रिय गोष्ट बोलू शकली नाही. तसेच त्याचेविषयी चित्तांत शंका येऊनही ती गोष्ट कोणास सांगण्यास ती साध्वी स्त्री असमर्थ झाली.

मासेनैत्य गृहेशस्तं दृष्ट्वोचे मत्स्वरूपधृक् ॥
कोऽसि भार्यां गृहं चार्थं कथं गृह्णास्यरेऽधम ॥२३॥

स प्रहाहं गृहस्वामी कस्त्वं मद्रूपधृक्खल ॥
त्वं खलस्त्वं खल इति विवदन्तौ विलोक्य तौ ॥२४॥

दृष्ट्वैकरूपौ चकिता मित्रश्वशुरबान्धवाः ॥
सर्वं रहसि पत्न्योक्तं ज्ञात्वा खिन्नोऽभवद्द्विजः ॥२५॥

झुटिंगेन स्त्रिया स्वैश्च विष्णुदत्तालयं द्विजः ॥
गत्वा शशंस तत्सर्वं ज्ञात्वाप्यैवावदत्स तौ ॥२६॥

अर्थ : नंतर एक महिन्याने त्या घरचा खरा मालक परत आला आणि त्या झोटिंगास म्हणाला, "माझे स्वरूप धारण करणारा तूं कोण आहेस? अरे अधमा, माझी भार्या, घर, द्रव्य तूं कां हरण केले आहेस?" त्यावर त्या झोटिंगाने उत्तर दिले, "अरे, मी या घरचा मालक असून तूच कोण माझे

रूप धरून आला आहेस? तूंच दुष्ट आहेस." याप्रमाणे ते परस्परांना दुष्ट व नीच संबोधताना पाहून व दोघेही सारख्याच रूपाचे पाहून, त्या ब्राह्मणाचे मित्र, श्वशुर, बांधव, सर्व चकित झाले. सर्व परिस्थिती एकांतात पत्नीकडून समजल्यावर तो ब्राह्मण खिन्न झाला. नंतर त्यानें झोटिंगास व स्वपत्नीस बरोबर घेतले व विष्णुदत्ताचे घरी जाऊन त्याला सर्व वृत्तांत कथन केला. तेव्हां सत्य काय आहे ते जाणूनही विष्णुदत्त त्यांना म्हणाला,

रूपं शीलं वयोऽवस्था स्वरवर्णाकृतिर्गतिः ॥
नामगोत्रकुलाद्येकं वदथः सत्यमत्र किम् ॥२७॥

क्षन्तव्यं निश्चिनोमीदमित्युक्त्वा सप्त मुद्रिकाः ॥
दत्वा समन्त्रा भालेऽसौ पृथक् पप्रच्छ संसदि ॥२८॥

कुप्यभाण्डांशुकान्नादि गेहे लक्ष्म च ते स्त्रियि ॥
प्रकाशं चाप्रकाशं च सर्वमाख्यातुमर्हसि ॥२९॥

लेखयित्वा पृथक् ताभ्यामुक्तं संसदि दूरतः ॥
तौ कृत्वा ब्राह्मणीं प्राह सत्यं कस्योभयोर्वद ॥३०॥

सा प्राह योऽद्य मां भुङ्क्ते तद्वाक्ये व्यत्ययो महान् ॥
अपरोक्तौ सत्यतेति तथेत्युक्त्वा द्विजोऽब्रवीत् ॥३१॥

अर्थ : "रूप, शील, वय, अवस्था, स्वर, वर्ण, शरीराकृति व गती तुम्हा उभयतांची सारखीच आहेत, तसेच नाम गोत्र व कुलादि एकच सांगता आहात, तेव्हां यांतील सत्य कोणते? ते मी निश्चित् करतो." असे म्हणून मंत्रपूर्वक प्रत्येकाच्या कपाळावर सात मुद्रा रेखून सभेमध्ये त्यांना वेगवेगळे बोलावून विचारले, "घरांत भांडी, कापडचोपड, अन्न तसेच स्त्रीच्या ठिकाणी असलेल्या प्रकट व गुप्त खुणा हे सर्व सांगा." त्याप्रमाणे प्रत्येकाकडून वरील बाबतीत वेगवेगळी उत्तरे लिहून घेऊन, त्या दोघांपासून ब्राह्मणस्त्रीस दूर नेऊन विष्णुदत्ताने तिला विचारले, "ह्या दोघांच्या उत्तरांपैकी खरे कोणते ते सांग." त्यावर तिने उत्तर दिले, "सध्या माझा जो उपभोग घेत आहे, त्याच्या

वाक्यांत (उत्तरांत) फार मोठा फरक दिसून येत आहे. दुसऱ्याचें ठिकाणीं खरेपणा दिसतो. "ठीक आहे," असे उत्तर देऊन विष्णुदत्त त्या दोघा ब्राह्मणांना म्हणाला,

पञ्चक्रोशात्मकमिदं क्षेत्रं कृत्वा प्रदक्षिणम् ॥
विप्रावेष्यति यः शीघ्रं पूर्वं स विजयी भवेत् ॥३२॥
तथेत्युक्त्वा गतौ तत्र क्षणार्धेन पिशाचकः ॥
परिक्रम्येत्य तत्राह कृता मेऽद्य प्रदक्षिणा ॥३३॥
लिङ्गानि पथि सर्वाणि देवतायतनानि च ॥
तानि सर्वाण्यसंदिग्धं कथयामास संसदि ॥३४॥
तच्छ्रुत्वा चकिता सर्वे सभ्या ऊचुः परस्परम् ॥
नेयं मनुष्यचेष्टातो भूतो [illegible] नात्र संशयः ॥३५॥
प्राप विप्रस्त्वकृत्स्नज्ञो दिनार्धे [illegible]ब्रवीत्समम् ॥
विष्णुशर्मा पुनः प्राह सिद्धाः कति गिराविह ॥३६॥
पृष्ट्वा तन्नाम गोत्रादि गिरिं कृत्वा प्रदक्षिणम् ॥
ब्रूयाद्यः शीघ्रमागत्य प्रथमं स जयी भवेत् ॥३७॥
इत्युक्तौ जग्मतुरुभौ मुहूर्तार्धात्पिशाचकः ॥
आगत्य स यथापृष्टं कथयामास सर्वशः ॥३८॥
विप्रस्तु पञ्चयामोर्ध्वमेत्य क्लेशादुवाच सत् ॥
सिद्धा न दृष्टास्तन्नाम गोत्रवार्ता कुतः पुनः ॥३९॥
तच्छ्रुत्वातीव विश्वासो विप्रस्याभूत्सभासदाम् ॥
विष्णुशर्मा पुनः प्राह परीक्षैकावशिष्यते ॥४०॥

अर्थ : "पांच कोस विस्तीर्ण असलेल्या ह्या क्षेत्राला प्रदक्षिणा करून जो सत्वर आधी येईल तोच विजयी होईल." हे वचन ऐकून ठीक आहे असे म्हणून ते दोघे ब्राह्मण निघून गेले. पैकीं पिशाच्च होता तो क्षणार्धांत

प्रदक्षिणा करून परत आला व म्हणाला, "मी प्रदक्षिणा करून आलो आहे." मार्गांतील सर्व लिंगे, देवळे वगैरेची संपूर्ण माहिती त्याने समेत सांगितली. ती ऐकून आश्चर्यचकित झालेले सर्व सभाजन परस्परांना म्हणाले, "हे कांही मनुष्याला शोभणारे वर्तन नव्हे. तेव्हां हे पिशाच्च आहे हे निश्चित." त्यानंतर जवळजवळ अर्धा दिवस लोटल्यानंतर ब्राह्मण परत आला. त्याला मार्गातील लिंगांची देवळांची वगैरे फारच थोडी माहिती सांगता आली. त्यानंतर विष्णुशर्मा पुन्हां म्हणाला, "ह्या पर्वतावर किती सिद्ध आहेत त्यांची नांवे गोत्रे याबद्दलची माहिती गिरीप्रदक्षिणा करून जो कोणी प्रथम येऊन सांगेल तो विजयी होईल". हे ऐकून ब्राह्मण व पिशाच्च दोघेही गेले. पिशाच्च एका क्षणांत परत आले व विचारलेली माहिती समग्रपणे सांगते झाले. परंतु ब्राह्मणाला मात्र परत येण्यास पांच याम म्हणजे १५ तास लागले, आणि त्याने कष्टाने उत्तर दिले, "मला कोणीही सिद्ध दिसले नाहींत, तर मग त्यांची नांवे व गोत्रे मला कोठून माहित होणार ? " हे त्याचे म्हणणे ऐकून सभेतील उपस्थितांना ब्राह्मणाबद्दल अत्यंत विश्वास उत्पन्न झाला. त्यानंतर विष्णुशर्मा म्हणाला, "आतां एकच परीक्षा शिल्लक उरली आहे".

इत्युक्त्वा लोहकरकं संस्थाप्योवाच तौ द्विजः ॥
वक्त्रेणाविश्य नालेन निर्गम्य स्त्री प्रगृह्यताम् ॥४१॥
इत्युक्तः सत्वरं भूतः सूक्ष्मरूपी समाविशत् ॥
कृतरक्षो द्विजो ध्यात्वा श्रीशं मन्त्रं जजाप ह ॥४२॥
दुर्धरं दुर्मुखं दुष्टं पिशाचमिन्द्रसंमृण ॥
बध्वा मन्त्रानुभावेन सर्वं रक्षो निबर्हय ॥४३॥
इत्यनेन मुखं नालं कीलयामास मध्यगः ॥
भूतोऽभूद्दुःखितो बद्धं तं तत्याज महागिरौ ॥४४॥

अर्थ : असें म्हणून एक लोखंडी झारी ठेऊन त्या दोघाना विष्णुशर्मा म्हणाला, "ह्या झारीच्या तोंडानें आंत प्रवेश करून नळीतून जो बाहेर येईल त्यास ही स्त्री मिळेल." हें ऐकून पिशाच्चानें तात्काळ सूक्ष्मरूप धारण

करून झारीच्या तोंडानें आंत प्रवेश केला. तेव्हां विष्णुशर्म्यानें ब्राह्मणाचें रक्षण करण्यासाठीं श्रीविष्णूचें ध्यान करून मंत्राचा जप केला. “ दुर्धर, दुर्मुख दुष्ट अशा ह्या पिशाच्चाला मंत्रप्रभावानें बांधून टाकून सर्व राक्षसांचा नाश कर.” अशा रीतीनें मंत्रप्रयोगानें मुख व नलिका बंद करून टाकल्यावर आंतील पिशाच्च दुःखी झाले. त्यानंतर त्याला (झारीला) विष्णुशर्म्यानें महापर्वतावर टाकून दिलें.

साध्वी विप्रः सदस्याश्च जहर्षुः प्राह तां द्विजः ॥
दृष्टमात्रो मयाज्ञातो झुटिंगोऽयं महाखलः ॥४५॥

सहसा निगृहीतेऽस्मिन्नपवादो मयीत्यतः ॥
कृतो यत्नः क्रमादेष लोकसंशयभेदकः ॥४६॥

शास्त्रक्रमाद्यथाज्ञस्य ज्ञानान्तः क्रियते तथा ॥
कृता प्रतिक्रियैषात्र नैव कस्यापि संशयः ॥४७॥

विश्वासः प्रथमे किञ्चिद्द्वितीये सविशेषकः ॥
तृतीये संशयश्छिन्नस्तुर्ये नाशमितोऽधमः ॥४८॥

सर्वे ततस्तदादिष्टा नत्वा जग्मुर्यथागतम् ॥
साध्वी साऽनिन्दिता हृष्टा स्वेशं लब्ध्वा तथैव सः ॥४९॥

एवं शास्त्रक्रमात्त्यक्तः संशयो यैः प्रयत्नत ॥
प्राक्सिद्धं प्राप्नुवन्त्येते शर्मासंशयमात्मनः ॥५०॥

अर्थ : ती साध्वी विप्रस्त्री, सभाजन, विप्र या सर्वांना आनंद झाला. विष्णुशर्मा त्या स्त्रीला म्हणाला, “ प्रथम पहाताक्षणींच मी त्याला अत्यंत दुष्ट असा झोटिंग म्हणून ओळखले होते. परंतु त्याला मी तात्काल पकडले असते तर माझ्यावर अपवाद आला असता. म्हणून मी क्रमाक्रमाने एकएक परीक्षा केली, की ज्यामुळें लोकांच्या संशयाचे निरसन झाले. अज्ञ माणसाच्या अज्ञानाचा अंत ज्याप्रमाणे शास्त्रक्रमाने केला जातो, तद्वत्च ह्याही ठिकाणी उपाययोजना मी केली आहे. त्यामुळें आतां निर्णयाबद्दल कोणासही शंका

उरलेली नाही. मी केलेल्या प्रथम परीक्षेने लोकांत किंचित् विश्वास उत्पन्न झाला; दुसऱ्या परीक्षेने जास्त विश्वास निर्माण झाला; तिसऱ्याने संशयनिरसन होऊन शेवटी त्या झोटिंगाचा नाश झाला ”. नंतर सर्वांनी विष्णुदत्तास वंदन केले व त्याची परवानगी घेऊन जसे आले त्याप्रमाणे आपल्या घरी निघून गेले. पवित्र मानलेली अशी ती साध्वी ब्राह्मणी आपल्या पतीच्या पुनः प्राप्तीने आनंदित झाली. त्याचप्रमाणें तो ब्राह्मणही संतुष्ट झाला. ह्याप्रमाणे क्रमाक्रमाने शास्त्रांच्या योगे जे संशयापासून मुक्त होतात, त्यांना आत्म्याचे पूर्वसिद्ध असे आनंदमय स्वरूप प्राप्त होते हे निश्चित.

गत्वोर्ध्वमपि भोगान्ते प्राप्येहौषधितो नरम् ॥
स्त्रीपुंयोगाच्छुक्ररक्तमयो गर्भत्वमेत्यृतौ ॥५१॥

कललं प्राक्पञ्चरात्राद्बुद्बुदः सप्तरात्रतः ॥
पेशी पक्षादर्बुदोऽथ भवति स्वस्तितो घनः ॥५२॥

मासात्कूरः कं द्वितीये तृतीयेऽस्याङ्कुरोद्भवः ॥
त्वक् चतुर्थे रोमनखाः पञ्चमे मासि षष्ठके ॥५३॥

छिद्राणि सप्तमे चित्त्वमष्टमे धीस्ततः स्मृतिः
नालरन्ध्राप्तरसमुङ्नार्तोऽपि म्रियतेः विधेः ॥५४॥

स्तौत्यथेश भवाभीतो मोचयार्य सुदुर्गतेः ॥
त्वां भजेऽतः परं नेदृग्गतिर्येन भवेन्मम ॥५५॥

स स्तुत्वैवं सुतिवायुत्यक्तो विस्मृतलब्धधीः ॥
रोरूयति जनुर्लब्ध्वा मोहितो माययोशितुः ॥५६॥

अनभिप्रेतमापन्न आसनोत्थानचेष्टने ॥
पराधीनतया भुङ्क्ते स व्यथां वक्तुमक्षमः ॥५७॥

क्रीडा संभोगचिन्ताक्तो बाल्ययौवनवार्धके ॥
पुनरावर्ततेऽज्ञानी ज्ञानी चेन्मुच्यतेऽचिरात् ॥५८॥

अर्थ : कर्मफलानुसार स्वर्गादि लोकांचा उपभोग घेऊन जीवाला पुन्हा स्त्रीगर्भवास पत्करावा लागतो. औषधींच्या (वनस्पतींच्या) द्वारा नरदेहात प्रवेश करुन स्त्रीपुरुषसंयोगांतून रेतरक्तमय गर्भाचे रुप ऋतुकालीं धारण करतो. सुरवातीस गर्भाचे जे असते त्यास कलल म्हणतात. पांच दिवसांनी त्यास बुडबुडे येतात. सात दिवसांनी पेशी तयार होते. पंधरा दिवसांनी गोळा तयार होतो. एक महिन्यानें तो गोळा कठिण होऊन; दोन महिन्यांनी त्यास डोकें होतें. तीन महिन्यांनी हातपाय हे अवयव होतात. चवथ्या महिन्यात त्वचा, पांचव्यात केंस व नखें व सहाव्या महिन्यांत नाक, डोळे, कान, गुद वगैरे छिद्रें तयार होतात. सातव्या महिन्यांत चेतना येते; आणि त्यानंतर बुद्धि व स्मृति येते. गर्भवासात असताना अत्यंत क्लेश भोगत असूनही नाळरंध्रांतून प्राप्त होणाऱ्या रससेवनाचे योगे तो जीव दैवयोगानें जगून राहतो, व परमेश्वराची अनन्यभावाने प्रार्थना करतो, हे ईश्वरा, संसाराला भ्यालेल्या माझी या दुर्गतीतून सुटका कर. इतःपर मी तुझे भक्ति करीन, म्हणजे माझी अशी गति होणार नाही." अशी स्तुति केल्यानंतर प्रसूति-वायुच्या प्रभावाने जननीउदरांतून बाहेर पडतो. परंतु प्राप्त झालेल्या ज्ञानाची त्यास पुन्हा विस्मृती होते व जन्म पावतांच परमेश्वरमायेच्या प्रभावाने मोहित होऊन तो रडूं लागतो. त्यानंतर बसणें, उठणें इतर क्रिया या सर्वच बाबतीत अनोळखी, परके असेच सर्व त्याचेपुढे येत असले तरी व्यथा बोलण्यास असमर्थ असल्याने तो सर्व गोष्टी पराधीनपणे भोगत रहातो. नंतर बाल्य, यौवन व वार्धक्य या अवस्थांत क्रमाने क्रीडा संभोग व चिन्ता यांनी व्यग्र राहून तो अज्ञ जीव पुन्हां जन्ममरणाच्या फेऱ्यांत गुंततो. पण ज्ञानी मनुष्य मात्र तात्काळ मुक्तता पावतो.

॥ इति श्रीदत्तपुराणे रोग्युद्धारादिकथनं नाम तृतियाष्टके सप्तमोऽध्यायः ॥३।७॥

बालविद्वच्चेष्टाभेदबन्धमोक्षमिथ्यात्वकथनं नाम तृतियाष्टकेऽष्टमोऽध्यायः ॥

हरिः ॐ ॥ इदमुत्यत्पुरुतमं ज्योतिरानन्दमात्मवान् ॥
ज्ञात्वाप्यास्थिरबोधोऽङ्ग द्वैताद्बिभेति तच्छ्रुणु ॥१॥
प्रतिष्ठाने द्विजः कश्चिज्ज्ञानविज्ञानतत्परः ॥
पूर्वाभ्यासाज्जन्मनैव मुक्तोप्यासीत्पिशाचवत् ॥२॥
लोकसङ्गाभ्द्रशं भीतो विषयेभ्यो विषाद्वान् ॥
मानभीत्यापि सर्वज्ञो दुश्चेष्टा व्यकृणोद्धिया ॥३॥
जन्मनैव ग्रहग्रस्तं मत्वा तं पितरौ बुधम् ॥
चक्रतुः पुत्रवात्सल्यात्प्रतीकारं प्रयत्नतः ॥४॥
व्रतोपवासनियम जपशान्तिसुरार्चनैः ॥
रक्षाबन्धनसत्तीर्थयात्रादानौषधादिभिः ॥५॥

अर्थ : हा चैतन्य स्वरूप आत्मा स्वयंप्रकाश आहे. उपाधिचे योगाने त्याचे स्वरुप दोन प्रकारचे भासते. तो व्यापक, स्वयंप्रकाश, चैतन्यरूप, आनन्दघन, आहे असे ज्ञान होऊनही, असंभावना, विपरीत भावना यापासून निवृत्त करणारा बोध होवूनही ऐकात्म्याचा साक्षात्कार न झाल्यामुळे द्वैतयुक्त संसाराची ज्ञानी माणसासही भीति वाटते. हे स्पष्ट करण्यासाठी खालील कथा सांगतात.— पैठण क्षेत्रांत कोणीएक आत्मज्ञानी व विज्ञान तत्पर ब्राह्मणपुत्र रहात होता. पूर्वजन्मींच्या अभ्यासामुळे तो या जन्मी जन्मतःच मुक्त होता. त्याचे आचरण पिशाचाप्रमाणे होते. त्याला लोकांच्या संसर्गाची फार भीति वाटत असे. तसेंच विषयसुखाचा मनापासून तिटकारा होता. सर्वज्ञ असूनही, लोक आपला मानसन्मान करतील या भीतिने तो बुद्धिपुरस्सर भलभलते चाळे करीत असे. त्यास जन्मतःच ग्रह व भूतपिशाच्यांनी ग्रासले असावे ह्या समजुतीने मातापित्यांनी पुत्रवात्सल्यामुळे प्रयत्नपूर्वक व्रत, उपवास, नियम, जप, ग्रहशांति, देवतांचे अर्चन, रक्षाबंधन, चांगल्या तीर्थांच्या यात्रा, दानें, औषध योजना वगैरे उपायांनी प्रतिकार केला.

प्रकृतिं न ययौ जाताः प्रयत्ना निष्फलास्तयोः ।
मलं मूत्रं तथा भक्ष्यं पानमन्नं न वेद सः ॥६॥
मलोत्सर्गादि कुरुते तिष्ठन्वापि स्वपन्नपि ।
अनर्थं किमपि ब्रूते न वेत्ति च हिताहितम् ॥७॥

उपनीतोऽष्टमेऽब्देऽपि सावित्रीं न जजाप सः ।
न चक्रे शिक्षितोऽत्युच्चैः सः सन्ध्यावन्दनादिकम् ॥८॥

विष्णुदत्तस्य माहात्म्यं श्रुत्वा तं पितरौ गृहम् ।
नीत्वा तस्योचतुः खिन्नौ भो ब्रह्मन्पाहि नः पितः ॥९॥

एक एव सुतो जातो जडो जन्मत आवयोः ॥
ग्रहग्रस्तोऽथवोन्मत्तो ज्ञात्वा नौ देहि जीवनम् ॥१०॥

अर्थ : मातापित्यांनी केलेल्या प्रयत्नांनी पुत्राची प्रकृती सुधारली नाही. त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. त्याला मल, मूत्र, खाद्य, पेय, अन्न, यांमधील भेदही कळत नव्हता. तो उभेपणी अगर झोपला असतां मलोत्सर्गादि क्रिया करीत असे. निरर्थक काहीही बडबडत असे. तसेच त्याला हितकर व अहितकर यांतील फरक कळत नसे. आठव्या वर्षी उपनयन झाले असूनही तो गायत्रीचा जप करीत नसे. किंवा शिक्षित असूनही संध्यावन्दनादि क्रिया करीत नसे. तेव्हां त्या मातापित्यांनी विष्णुदत्ताची कीर्ती ऐकून आपल्या पुत्रास त्याच्या घरी नेले. व विष्णुदत्तास खिन्न वदनाने म्हटले "हे ब्रह्मन्, तूं आमचें रक्षण कर. तूं आमचा पिता आहेस. आम्हास एकच पुत्र असून तो जन्मतःच जडमूढ होऊन राहिला आहे. त्याला ग्रहांनीं ग्रासलें आहे, किंवा तो उन्मत्तच आहे, याची परीक्षा करून आम्हास जीवदान द्यावें."

पुत्रं कृतार्थं ज्ञात्वा तत्पितरौ प्राहस द्विजः ॥
विश्राम्यतां गृहे भुक्त्वा पुत्रो वामत्र तिष्ठतु ॥११॥

इत्युक्तौ तौ गतौ भोक्तुं विष्णुदत्तोऽवदत्स तम् ॥
कस्त्वं कस्य किमायातः किं ते कार्यं करोषि किम् ॥१२॥

गम्यतां स्वपितुर्गेहे भुज्यतां सुखमुत्तमम् ॥
मया ते किं विधातव्यं त्यज चेष्टां वदाधुना ॥१३॥

इत्युक्तः प्राह संबन्धो निजबोधात्मनः क मे ॥
किं करोमि क यास्यामि किं गृह्णामि त्यजामि किम् ॥१४॥

ततं कल्पाम्बुनेवेदमात्मना सच्चिदात्मना ॥
अन्नादोऽहमहं चान्नं किं मे भोग्यं सुखात्मनः ॥१५॥

अर्थ : विष्णुदत्तानें त्यांचे भाषण ऐकलें. त्यांचा पुत्र कृतार्थ व ज्ञानी आहे हें जाणून तो त्यांना म्हणाला, " आपण घरांत जाऊन भोजन करून विश्रांति घ्या. तुमचा हा पुत्र येथें राहूं दे. " त्यावर ते दोघे आंत भोजनास गेले. तेव्हां विष्णुदत्त त्या ब्राह्मण पुत्रास म्हणाला, " तूं कोण व कोणाचा आहेस ? येथें (या भूतलावर) कां आला आहेस ? तुझें कार्य काय ? काय करणार आहेस ? आपल्या पित्याच्या घरी जाऊन उत्तम सुखाचा भोग घ्यावास. मी तुझें काय करावे ? सर्व चेष्टा सोडून दे व आतां काय तें स्पष्ट सांग. " हें विष्णुदत्ताचें भाषण ऐकून तो ब्राह्मणपुत्र म्हणाला, " निजबोधात्मस्वरूप अशा माझा संबंध कोठे आहे ? मग मी काय करावें, कोठें जावें, काय स्वीकारावें व काय त्यजावें ? प्रलयकालीन जलाप्रमाणें आत्मस्वरूपानें हें सर्व जगत् व्यापलेलें आहे. तेव्हां अन्न देणाराही मीच व अन्नही मीच आहे. सुखात्मस्वरूप अशा मी काय भोगावयाचे उरले आहे ?"

तच्छ्रुत्वा तं समालिङ्ग्य दत्तभक्तोऽवदन्मुदा ॥
तुर्याचारेण विद्वंस्ते कोऽत्र दोषो भविष्यति ॥१६॥

जागृतिस्तिसृषु स्वप्नस्तुर्या भूर्ब्रह्मविच्चिह ॥
परा निद्रेह ब्रह्मज्ञवरो गाढसुषुप्तिका ॥१७॥

षष्ठीहान्य उत्तिष्ठेद्वरीयान्सोऽपि कर्मकृत् ॥
तुर्यान्त्यात्र वरिष्ठो ज्ञोऽक्रियस्ताहग्भवान्न हि ॥१८॥

जीवमुक्तः सुखं तिष्ठ शिक्षयान्यान्क्रियाः कुरु ॥
बन्धो देहाभिमानोऽत्र तत्त्यागो मुक्तिरुच्यते ॥१९॥
अहं ममेति संबन्धः कुतः स्वात्मदृशो भवेत् ॥
मानावमानजो दोषो निरहंकृतितः कुतः ॥२०॥

अर्थ : तें ब्राह्मणपुत्राचें भाषण ऐकून दत्त भक्त विष्णुदत्तास आनंद झाला. ब्राह्मणपुत्रास आलिंगन देऊन तो म्हणाला, "असें जर आहे, तर आचार पाळून वागण्यात काय दोष आहे? शुभेच्छा, विचारणा, तनुमानसा, सत्वापत्ति, असंसक्ति, पदार्थाभाविनी, तुर्या, अशा अवस्था (भूमि) आहेत. पहिल्या तीन अवस्थांत असलेल्या स्थितीस जागृतावस्था म्हणतात. सत्वापत्ति म्हणजे स्वप्न येथे असलेल्यास ब्रह्मवित् म्हणतात. पांचवी असंसक्ति, म्हणजे निद्रावस्था. ह्या अवस्थेंत असणाऱ्या साधकास ब्रह्मविद्वर म्हणतात. सहावी पदार्थभाविनि म्हणजे गाढसुषुप्ति. ह्या अवस्थेत असणाऱ्यास वरीयान् म्हणतात. शेवटची अवस्था तुर्या त्या अवस्थेतील साधकास वरिष्ठ म्हणतात. त्या अवस्थेत कोणतीच क्रिया नसते. तुझी अद्याप तशी स्थिति झाली नसल्यानें तूं कर्म केलें पाहिजेस. तूं जीवन्मुक्त होऊन सुखानें रहा, परंतु क्रिया करून इतरांना शिक्षण दे. देहाभिमान म्हणजे बन्ध, त्याचा त्याग हीच मुक्ति. जे आत्मदर्शी आहेत, त्यांना मी व माझें हा संबंध कोठून असणार? त्याच प्रमाणें मान व अपमान यांनी निर्माण होणारा दोष निरहंकारी माणसांना कोठला?

मानावमावे विषयवासना विक्रिया कुतः ॥
समाहितमनास्तस्मान्मुक्तोऽयं निरहंकृतिः ॥२१॥
एवं सन्नपि नो मूढो बध्यते किं पुनर्भवान् ॥
मनोऽर्थसङ्गि बन्धाय निरर्थं मुक्तये च तत् ॥२२॥
गृहकृत्यरतापि स्त्री परव्यसनिनी यथा ॥
तदेवास्वादयत्यन्तः परसङ्गरसायनम् ॥२३॥
तथा ब्रह्मणि विश्रान्तः समाहितमनाः सुधीः ॥
तदेवास्वादयत्यन्तर्बहिर्व्यवहरन्नपि ॥२४॥

दिवस्पृष्ठेऽङ्ग मोक्षो न पातालेऽपि न भूतले ॥
अहंकृतेर्विमोहस्य क्षयो मोक्षो न चापरः ॥२५॥
सुकरोऽहंकृतेस्त्यागः पुष्पावदलनादपि ॥
दृङ्मीलनादपि प्राज्ञ न क्लेशोऽत्र मनागपि ॥२६॥
स्फूर्तिभ्रान्तिगतिव्याप्तिसंहतिस्वान्यतामुखाः ॥
ज्ञात्वा चलमनश्चेष्टास्तत्परस्त्वं सुखी भव ॥२७॥

अर्थ : अभिमानशून्यता ज्याचे ठिकाणी आहे, त्याला विषयवासनेचे विकार कुठून असणार? निरंहकारी मनुष्याचें मन समाहित व शांत असल्यानें तो खऱ्या अर्थानें मुक्त असतो. अशा प्रकारचा मूढहि मुक्त असतो, मग तुझी गोष्ट तर वेगळीच आहे. (कारण तू ज्ञानी आहेस). विषयासक्त मन हे बन्धाचे कारण होते, पण तेच अनासक्त असेल तर मुक्तीस कारण होते. उदाहरणार्थ एखादी परव्यसनी स्त्री स्वतःच्या गृहांत कामकाजांत मग्न राहूनही मनांतून परसङ्ग करत असल्यानें तिला त्याचेच फळ मिळते. त्याप्रमाणे ब्रह्माचें ठिकाणीं ज्याचे चित्त विश्रांत झालें आहे असा समाहितमान बुद्धिमान मनुष्य, बाह्यतः इतर व्यवहार करत असूनही, अंतःकरणांत ब्रह्मसुखाचाच आस्वाद घेत असतो. हे ब्राम्हणपुत्रा, मोक्ष हा काही दिवसा, रात्रीं, पातालांत, भूतलावर, असा विशिष्ट काली किंवा ठिकाणी नसतो. अहंकाराचा नाश म्हणजेच मोक्ष. अहंकाराचा त्याग करणे हे एखादे फूल चुरगळण्याहूनही सोपे आहे दृष्टीस दृष्टी मिळविण्याइतके सोपें आहे. हे सूज्ञा, त्यांत किंचितही त्रास नाही. स्फूर्ति, गति, भ्रांति, व्याप्ति, संहति इत्यादि चेष्टा चंचल मनाच्या असतात. तूं ब्रम्हनिष्ठ व तत्पर असल्यानें तुला त्या बाधक होणार नाहीत. हे जाणून तूं साक्षीरूपानें कर्म करून सुखी हो.

निर्बन्धं न करोमि ज्ञ कंचित्कालं तथा वस ॥
पित्रोः प्रेम समालोच्य बन्धस्तेन न ते स्वदृक् ॥२८॥
इत्युक्तः स तथेत्युक्त्वा भुक्त्वा तद्धाम्नि सज्जनम् ॥
मयं साध्व्यन्नमाहात्म्याज्जहौ चेष्टाश्च कल्पिताः ॥२९॥

पितरौ प्रेक्ष्य तं शान्तं विप्रं नत्वोचतुः प्रभो ॥
को मन्त्रो भेषजं वास्य कल्पितं शीघ्रमुक्तिदम् ॥३०॥
दत्तं नौ जीवनं ब्रह्मन्नित्युक्त्वा तौ गतौ गृहम् ॥
तदादिष्टोऽप्यभीः पुत्रस्तस्थौ धाम्न्यात्मसंगतः ॥३१॥
तदेकं शास्त्रतात्पर्यमज्ञस्यानुपदं भयम् ॥
भयमात्रावशेषो हि विज्ञानामृतसागरः ॥३२॥
बुद्धोऽपि सङ्गभीमात्रावृतो विप्रसुतो यथा ॥
तथा सर्वोऽपि लोकोऽयं मोहमात्रावृतो मृषा ॥३३॥
स्वात्मानमनुभूयापि सर्वदा चिद्घनं परम् ॥
कर्ता विकर्ता दाताहं भोक्ता च सुखदुःखयोः ॥३४॥

अर्थ : "मी तुला कर्मानुष्ठानाचारासंबंधी आग्रह करीत नाही. कारण तूं स्वतः ज्ञानी आहेस. परंतु तुझ्यावरील मातापित्यांचे प्रेम लक्षांत घेऊन कांहीं काळ यथोचित कर्में करीत रहा. तूं आत्मदृक् असल्यानें तुला अशा वागण्यानें कांहीं बंधन नाही." विष्णुदत्ताचे हे भाषण ब्राह्मणपुत्रानें ऐकले, व ठीक आहे असें म्हणून त्याच्या घरी भोजन केले. साध्वी स्त्रीच्या हातचें पवित्र भोजन केल्यानें ब्राह्मणपुत्राचे संगजन्य भय व वेडेपणाचे चाळे बंद झाले. आईबापानी आपल्या शांत झालेल्या पुत्रास पाहिलें व विष्णुदत्तास आदरपूर्वक नमस्कार करून म्हटले, " महाराज, सर्व पीडेपासून तात्काळ मुक्त करणारा, कोणता मंत्र किंवा कोणतें औषध आपण यास दिले ते कृपा करून सांगा. तुम्ही आम्हाला साक्षात् नवजीवन दिले आहे." असें म्हणून ते दोघे आपल्या घरी परत गेले. विष्णुदत्तानें उपदेश केलेला तो ब्राह्मणपुत्रही निर्भयपणे आत्मचिंतनपर राहून आपल्या पित्याच्या घरी राहू लागला. तेव्हां शास्त्रांचें एक तात्पर्य असे की अज्ञ माणसास प्रत्येक पावलीं भय असते. म्हणून शहाण्याने हंसाप्राणें नीरक्षीरन्यायानें तर्कसंगत व श्रुतीला अनुकूल असें अद्वैतच स्वीकारावें, विज्ञानामृतसागर हा भयशेषयुक्तच आहे. ज्ञानी असूनही सङ्गज भीतीने ग्रासल्यामुळें ब्राह्मणपुत्राची जशी स्थिति झाली होती, त्याचप्रमाणें चिद्घन अशा परमात्म्याचे स्वरूप अनुभवलेले ज्ञानी लोकसुद्धां मोहावरणाने ग्रस्त होऊन

विनाकारण मी कर्ता, मी विकर्ता, मी दाता, मीं सुखदुःखांचा भोक्ता—(असे समजतात.)

कोऽहं केऽमी कुतो मोहः क्व सुखं चेति चिन्तयन् ॥
भ्रान्त्यैव नित्यमुक्तोऽपि बहिर्धावति मुह्यति ॥३५॥
नासाभूषां यथा कण्ठे धृत्वा विस्मृत्य सा मम ॥
नष्टेति शोचत्यज्ञा स्त्री तथात्मार्थमयं जनः ॥३६॥
तदर्थं सर्वशास्त्राणि बोधयन्ति प्रकारतः ॥
मोहमात्रनिरासे हि पर्यवस्यन्त्यनुक्रमात् ॥३७॥
महान्त्यल्पानि शास्त्राणि नाणुमात्रभ्रमाय हि ॥
स्वबुध्येदं विचार्येन्द्र वदेदं साध्वसाधु वा ॥३८॥
इत्युक्तो गुरुणा हेन्द्रो नत्वा साधूदितं गुरो ॥
क्षमस्वातिक्रमं मेऽद्य शास्त्रतत्त्वमवेदि सत् ॥३९॥

अर्थ : मी कोण, हे इतर सर्व कोण, मोह कोठून, सुख कोठे, असा अनेक प्रकारें विचार करीत एखाद्या भ्रान्तिष्टाप्रमाणें मोकाट धांवत रहातात नित्यमुक्त असूनही त्यांची अशी स्थिति होते. एखादी अज्ञ स्त्री स्वतःची नाकांतील नथ गळसरीस खोचून ठेवते आणि कांहीं वेळानें ती गोष्ट विसरून नथ हरविल्याबद्दल शोक करूं लागते. त्याचप्रमाणे सर्व लोकाचें आत्म्या-बद्दलचें वर्तन असतें. ह्या अज्ञानाचा निरास करण्यासाठीं सर्व शास्त्रें निर-निराळ्या प्रकारे बोध करतात. शास्त्र लहान असो वा मोठे असो, त्यांचेपासून अणुमात्र भय निर्माण होणार नाहीं. (देवगुरु म्हणतात) हे इन्द्रा, तूं स्वतःच्या बुद्धिने याचा विचार कर. आणि शास्त्रें चांगली किंवा वाईट, कोणते चांगलें व कोणते वाईट ते मला सांग. " या प्रमाणे देवगुरुंचें भाषण ऐकून इंद्राने त्यांना साष्टांग प्रणिपात केला व उत्तर दिले, " हे गुरो, आपण मला फारच उत्तम रीतीने समजावून सांगितले आहे. मी आज शास्त्रांचें खरें तत्त्व आपल्या-पासून जाणले आहे. माझ्या अतिक्रमणकारक बुद्धिबद्दल आपण क्षमा करावी. "

श्रीदत्तः प्राह राजेंद्र संवादोऽयं मयोदितः ॥
शास्त्रैर्वीप्रतिपत्तिः क्व सर्वाण्येकपराणि हि ॥४०॥

मनोजवा गतिर्व्योम्नि विविधा योगसिद्धयः ॥
तत्सर्वं नश्वरं विद्धि मोक्षमेकं सनातनम् ॥४१॥

सोऽप्यात्मन्युपचारोऽयं बन्धः क्वास्योत मोक्षणम् ॥
अज्ञानजनबोधाय व्यवस्थेयं प्रकल्पिता ॥४२॥

सत्यं ज्ञानमनन्तं यद्ब्रह्माचिन्त्यमरूपकम् ॥
भ्रमेण कल्पितं नामरूपेऽत्र सदसत्परे ॥४३॥

मोहमात्रो भ्रमोऽनादिस्तन्नाशायात्र वस्तुनि ॥
विकल्पितत्त्वलक्ष्यत्वसंबंधाद्यास्तु कल्पिताः ॥४४॥

जीव ईशश्च तद्भेदोऽविद्याचित्तद्युतिस्त्वियम् ॥
षडस्माकमनादीयं मृषा जीवेशकल्पना ॥४५॥

रौप्यं शुक्ताविव स्थाणाविव तस्कर आत्मनि ॥
नाविद्यातः कुतो भेदः केन योगः परात्मनः ॥४६॥

अर्थ : त्यानंतर श्रीदत्तात्रेय कार्तवीर्य राजास म्हणाले, "हे राजा, देवगुरु व इंद्र यांचा हा संवाद मी तुला सांगितला. शास्त्रांच्या योगानें विपरीत ज्ञान कसें होईल? ती सर्व अद्वैत ब्रह्माचेंच प्रतिपादन करतात. अरे, आकाशांत मनोगतीनें संचार करता येणे, वगैरे ज्या योगसिद्धी, त्या सर्व न टिकणाऱ्या क्षणभंगुर आहेत. मोक्ष एकच चिरकाल टिकणारा आहे. मोक्ष सत्य आहे म्हटले म्हणजे बन्धाचेही अस्तित्व मान्य केल्यासारखे झाले, अशी शंका घेतल्यास, त्याचें उत्तर असें की, बन्धन हा आत्म्यावर एक उपचार आहे. अज्ञानी जनांना बोध व्हावा म्हणून बंध व मोक्ष ह्या शद्बांचा वापर करावा लागतो. वास्तवतः मोक्षही नाही व बंधही नाही, 'न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधकः ॥ न मुमुक्षुर्न वा मुक्त इत्येषा परमार्थता ॥' सत्य, ज्ञान, अनन्त असे जे अचिन्त्यरूप ब्रह्म आहे, त्याचे ठिकाणी नामरूपादि भाषाव्यवहार भ्रमात्मक, कल्पित व औपचारिक आहे. मोहमात्र भ्रम हा अनादि आहे. त्याचे नाशासाठी आत्मरूप वस्तुचे ठिकाणी कल्पना विशेषांचा संबंध व महावाक्य लक्ष्यत्व, इत्यादि संबंध शाखाचंद्रन्यायाने काल्पनिक मानलेले आहेत, जीव व ईश यांचा भेद म्हणजेच अविद्येत प्रतिबिंबित झालेला सोपाधिक आत्माच होय शुक्तीचे ठिकाणीं रजताची कल्पना, किंवा वृक्षाच्या खोडाचे ठिकाणीं

चोराची कल्पना, त्याचप्रमाणें आत्मस्वरूपाचे ठिकाणीं इतर कल्पना करणे हे अविद्येचे लक्षण आहे.

मिथ्याभ्रमोऽप्यनर्थाय यतो भेदो विमोहदः ॥
योगादिस्तद्विनाशाय नैवायं वस्तुसिद्धये ॥४७॥

वस्तु सत्स्वप्रकाशं नो न क्वाप्यन्यदपेक्षते ॥
भ्रममात्रान्तरे त्वत्र विकल्पो नैव वस्तुनि ॥४८॥

द्वैतं नास्त्यत्र नासीत्प्राङ् न भविष्यत्यनर्थकम् ॥
अपि भातं मृषैवेन्द्रजालवत्तन्मनोमयम् ॥४९॥

भ्रम एव जगत्सर्वं भ्रम एवास्य संसृतिः ॥
भ्रमे सति प्रणष्टेऽस्मिन्नेकः स्वात्मैव शिष्यते ॥५०॥

तस्माद्भ्रमं निराकृत्य ज्ञानयोगपरो नरः ॥
इहैव भजति स्वस्थः परमानन्द आप्लुतः ॥५१॥

इति श्रुत्वा गुरोर्वाक्यमर्जुनो नष्टसंशयः ॥
स्थैर्याय प्राप्तबोधस्य पर्यपुच्छत्त्र्यधीश्वरम् ॥५२॥

अर्थ : मिथ्याभ्रमाने अनेक अनर्थ होतात, आणि आत्मभिन्नता म्हणजें द्वैत. यानी मोहादिकांची उत्पत्ती होते म्हणून योगशास्त्राची गरज आहे. आत्मसिद्धीसाठी योगाची जरुरी नाही. कारण आत्मवस्तु स्वतः सिद्ध आहे. तो कालत्रयाबाध, सद्रूप, स्वयंप्रकाश आणि सर्वव्यापक आहे. भ्रमामध्ये विकल्प निर्मिती होते. आत्म्याचें ठिकाणी नाही. आत्म्याचे ठिकाणी द्वैत नाही. ते आरंभापासून नाही आणि पुढेहि असणार नाही. द्वैत अनर्थकारक असते. द्वैत इन्द्रजालाप्रमाणें खोटे असून मनोमय असते. येवढेच नव्हे तर हे सर्व जगत् म्हणजे एक मोठा भ्रमच आहे. त्याचा पसारा हाही भ्रममयच आहे, आणि हा सर्व भ्रम नष्ट झाला असतां एकमेव आत्माच उरतो. म्हणून ज्ञानयोगपर मनुष्य भ्रमाचे निराकरण करून याच जन्मी परमानंदांत बुडुन स्वस्थपणे आत्म्याला भजतो. " याप्रमाणे श्रीदत्तात्रेयांचे भाषण ऐकून कार्तवीर्य राजाचा संशय नष्ट झाला, आणि मिळालेल्या बोधाच्या स्थैर्यासाठी श्रीदत्तात्रेयांना त्याने शंका विचारली.

इति श्रीमद्दत्तात्रेयपुराणे उपासनाकाण्डे तृतीयाष्टकेऽष्टमोध्यायःसमाप्तः ॥